# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या १३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.२६ ऑगस्ट, २०१६ सकाळी ११:०० वा.

अधिसभेची १३ वी बैठक दि.२६ ऑगस्ट, २०१६ रोजी सकाळी ११:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. देशपांडे एस. एम., विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | श्री. मते एच. बी., संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ | सदस्य |
| ५) | श्री. मिश्रा डी. एन., कुलसचिव | सचिव |

**स्वागत:**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती :**

डॉ. नंदनवार डी. आर., प्रभारी सहसंचालक, मा. संचालक (तंत्र शिक्षण) यांचे प्रतिनिधी, पुणे व प्रा. एस. एस. सुर्यवंशी, प्र. ग्रंथपाल यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. मा. संचालक, (D. M. E. R.) मुंबई, मा. श्री. गणपतराव देशमुख, विधानसभा सदस्य व मा. ॲड. दिलीप सोपल, विधानसभा सदस्य अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

- वर्ल्ड एज्युकेशन कॉंग्रेस मुंबई यांच्याकडून प्रा. डॉ. एन. एन. मालदार यांना "अति प्रभावशाली १०० कुलगुरु" या पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यामूळे डॉ. एस. एम. देशपांडे, विभागीय सहसंचालक (उ. शि.) मा. संचालक (उ. शि.) पुणे यांचे प्रतिनिधी यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला त्यावर श्री. एच. बी. मते, संचालक विद्यार्थी कल्याण यांनी अनुमोदन दिले.

कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा.कुलगुरुंना बाराव्या अधिसभेच्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

"अ" **कुलसचिव कार्यालय:**

१. भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने दि.१७ मार्च, २०१६ रोजी विद्यापीठ सभागृहामध्ये विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादामध्ये आमंत्रित मान्यवरांची व्याख्याने संपन्न झाली. या कार्यक्रमास विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक आणि अधिकारी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

२. दि. १९ मार्च, २०१६ रोजी वित्त व लेखाधिकारी पदाच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. सदर मुलाखतीस उपस्थित असलेल्या उमेदवारामधून निवड समितीने श्री. बी. सी. शेवाळे यांची नेमणूक करण्याची शिफारस केली तसे नियुक्तीचे आदेश संबधितांना पारित करण्यात आले आहेत.

३. शै. वर्ष २०१६-१७ करीता निवड आधारित श्रेयांक प्रणाली नुसार सुधारित अभ्यासक्रम तयार करुन घेण्यासाठी उपसमितीच्या व अस्थाई अभ्यास मंडळाच्या बैठका संपन्न झाल्या.

४. दि. १५ फेब्रुवारी, २०१६ रोजी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्रतिष्ठान व सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने "विठ्ठल रामजी शिंदे यांचा धर्मविचार व त्याची प्रस्तुतता" या विषयावर विद्यापीठाच्या सभागृहामध्ये एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. सदर चर्चासत्रात प्रसिध्द संशोधक डॉ. अशोक चौसाळकर, कोल्हापूर, जेष्ठ साहित्य समीक्षक मा. श्री. गो. मा. पवार व डॉ. रणधिर शिंदे, कोल्हापूर यांची व्याख्याने संपन्न झाली या चर्चासत्राचा लाभ विद्यापीठातील बहुसंख्य शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक आणि विद्यार्थ्यांनी घेतला.

५. शै. वर्ष २०१६-१७ मध्ये विद्यापीठातील विविध संकुलातील अधिविभागामध्ये प्रवेश समिती गठित केली असून सदर समितीची प्रथम बैठक दि. २२/०३/२०१६ रोजी विद्यापीठामध्ये संपन्न झाली.

६. प्रस्तुत विद्यापीठातील कुलसचिव या संवैधानिक पदाची जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांची दि. २३/०४/२०१६ रोजी विद्यापीठ कार्यालयात मुलाखत आयोजित करण्यात आली होती. सदर मुलाखतीत निवड समितीने शिफारस केल्यानुसार डॉ. देबेंद्रनाथ मिश्रा यांना नियुक्ती आदेश पारित करण्यात आले. सदर नियुक्ती आदेशानुसार डॉ. देबेंद्रनाथ मिश्रा हे दिनांक ०९/०५/२०१६ रोजी विद्यापीठात कुलसचिव पदी रुजू झाले आहेत.

प्रस्तूत विद्यापीठातील कुलसचिव श्री. एस. के. माळी नियत वयोमानानुसार दि.३० एप्रिल, २०१६ रोजी सेवानिवृत्त झाले.

७. प्रस्तुत विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलातील प्रा. डॉ. ए. डी. सागर (दि. ०१/०४/२०१६ रोजी प्राध्यापक पदी रुजू) दि. २५/०४/२०१६ रोजी त्यांचा कर्तव्य रजेवर असताना नांदेड जवळ अपघात झाला व उपचारा दरम्यान दि. २६/०४/२०१६ रोजी त्यांचे दु:खद निधन झाले. याबाबत दि. २९/०४/२०१६ रोजी मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ सभागृहामध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

८. शै. वर्ष २०१६-१७ साठी विद्यापीठ अधिविभागातील व संलग्नित महाविद्यालयातील एम.ए., एम.एस्सी., एम.कॉम व एम.सी.ए. या अभ्यासक्रमाच्या प्रवेश पूर्व परीक्षेसाठी समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीकडून प्रवेश माहिती पुस्तिका तयार करण्यात आली आहे. सदर प्रवेश समिती बैठकीतील ठरावानुसार प्रवेश पूर्व परीक्षेचे ऑन लाईन अर्ज दि. ०९/०५/२०१६ ते २८/०५/२०१६ दरम्यान भरण्यात आले; व प्रवेश पूर्व परीक्षा दि. ६, ७ व ८ जून, २०१६ रोजी सोलापूर, बार्शी, पंढरपूर, सातारा व कोल्हापूर या केंद्रावर प्रवेश पूर्व परीक्षा घेण्यात आली.

९. बी.बी.ए., बी.सी.ए. व बी.एस्सी. (ई.सी.एस.) या अभ्यासक्रमाच्या प्रवेशपरीक्षेसाठी प्रवेश समिती गठित करण्यात आली व समितीमार्फत माहितीपुस्तिका तयार करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा अर्ज दि. २६/०५/२०१६ ते १८/०६/२०१६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने मागवून सदर अभ्यासक्रमाची एकूण २,१७८ विद्यार्थी करिता प्रवेश परीक्षा दि. २४/०६/२०१६ रोजी घेण्यात आली आहे. ३० जून, २०१६ रोजी प्रवेश परीक्षेचा निकाल ऑनलाईन द्वारे प्रसिध्द करण्यात आला असून सदरच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार महाविद्यालयांचे वाटप करण्यात आले. शै. वर्ष २०१६-१७ संलग्नित महाविद्यालयातील बी.बी.ए./बी.सी.ए./बी.एस्सी. (ई.सी.एस.) या अभ्यासक्रमासाठी द्वितीय प्रवेश परीक्षा दि. २९ जुलै, २०१६ रोजी घेण्यात आली असून एकुण ३७९ विद्यार्थ्यांनी प्रवेश पूर्व परीक्षा दिली असून त्यांचे निकाल ०३/०८/२०१६ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून दि. ०५ ऑगस्ट, २०१६ पासून या विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालय स्तरावर घेण्यात येत आहेत.

१०. शै. वर्ष २०१६-१७ पासून सोलापूर शहराच्या महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखेतील अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षाचे प्रवेश केंद्रीय प्रवेश पध्दतीने करण्यासाठी योग्य पध्दत ठरविण्यासाठी गठन केलेल्या समितीच्या व उपसमितीच्या आजतागायत एकूण ४ बैठका आयोजित करुन प्रवेश प्रक्रियेच्या पध्दतीचा मसूदा तयार करण्यात आला आहे. विद्यापीठ संलग्नित सोलापूर शहरातील महाविद्यालयात सुरु असलेल्या कला वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखेच्या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश केंद्रीय पध्दतीने करण्यात आले असून प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन प्रणालीद्वारे झाली असून दि. १४/०६/२०१६ ते २१/०६/२०१६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत होती एकूण ५,१३५ विद्यार्थ्यांची ऑनलाईन नाव नोंदणी केली. दि. १४/०६/२०१६ ते १९/०७/२०१६ पर्यंत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. प्रवेशापासून वंचित राहीलेल्या उर्वरित विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी दि. २६/०७/२०१६ रोजी मा. प्राचार्यांची बैठक घेवून बी.कॉम., बी.एस्सी. बायोटेक्नोलॉजी या अभ्यासक्रमाकरीता प्रवेश क्षमतेपेक्षा १०% ते २०% प्रवेश क्षमता वाढवून भरुन घेण्याचा निर्णय झाला.

११. शै. वर्ष २०१५-१६ या कालावधीत प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय ओ.बी.सी. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीपोटी रु. ९,१३,७५५/- इतकी रक्कम प्राप्त झाली असून सदर रक्कम विद्यापीठ खात्यामध्ये वर्ग करण्यात आली आहे.

१२. ज्या विद्यार्थ्यांचे स्थलांतर दाखला/स्थानांतर किंवा दुबार स्थलांतर दाखला/स्थानांतर दाखला किंवा दोन्हीही गहाळ झाले असतील अशा विद्यार्थ्यांना पात्रता कायम करण्यासंदर्भात नियमावली तयार करुन संबंधित महाविद्यालयांना व संकुलांना कळविण्यात आले आहे.

१३. ज्या महाविद्यालयांनी नजर चुकीने अधिकचे पात्रता शुल्क विद्यापीठामध्ये जमा केले आहे त्यांना अधिकच्या रक्कमेचा परतावा दिला. तसेच महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांच्या पात्रता करण्यासंदर्भात त्रुटींची पूर्तता करण्यात आली आहे.

१४. प्रस्तुत विद्यापीठाच्या सन २०१३-१४ मधील १० वा वार्षिक अहवाल सन २०१६ च्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात मुंबई येथे विधान मंडळाच्या दोन्ही पटलावर ठेवण्याबाबत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेवून मराठी व इंग्रजी भाषेतील वार्षिक अहवालाच्या पुस्तक स्वरुपातील एकूण ५० प्रती (मराठी २५ व इंग्रजी २५) व २५ प्रती सी.डी. सह दि. ०६/०४/२०१६ रोजी पाठविण्यात आले.

१५. प्रस्तुत विद्यापीठाच्या सन २०१४-१५ च्या ११ व्या वार्षिक अहवालांच्या सर्व दुरुस्त्या डी.टी.पी. मध्ये करुन घेतल्या आहेत. डी.टी.पी. होवून आलेली प्रत मराठी अहवालाच्या मुद्रित शोधन कामासाठी मा. डॉ. श्रीमती वडगबाळकर एस. एस. व इंग्रजी अहवालाचे मुद्रित शोधन व अनुवाद करण्यासाठी मा. प्रा. संतोष राजगुरु यांना देण्यात आले. दि.१७/०६/२०१६ रोजी वार्षिक अहवाल समितीची बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत ५ छायाचित्रांची निवड करण्यात आली तसेच मुद्रित शोधन व भाषांतर झालेल्या वार्षिक अहवालात योग्य त्या दुरुस्त्या करण्यात आल्या व पुढील बैठकीत मसुदा मान्यतेसाठी व उर्वरित छायाचित्रे निवड करण्याचे ठरले. त्याअनुषंगाने पुढील बैठकीचे आयोजन करुन दि.२१/०७/२०१६ रोजी छायाचित्रांची निवड करण्यात आली. तसेच मराठी अंक व इंग्रजी अंकामध्ये काही दुरुस्त्या सुचवून मराठी व इंग्रजी अंक मुद्रित शोधन व भाषांतर केलेल्या श्रीमती डॉ. वडगबाळकर व डॉ. संतोष राजगुरु यांना पुन्हा व्यवस्थित तपासण्यासाठी देण्यात आले.

श्रीमती डॉ. वडगबाळकर व डॉ. संतोष राजगुरु यांनी तपासून दिलेले अंतिम अंक डी.टी.पी. मध्ये अंतर्भाव करण्यासाठी मुद्रकाकडे पाठविण्यात आले आहे.

१६. मा. श्रीमती मनिषा वर्मा, संचालक व सचिव, राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA), यांनी विहित नमुन्यात सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ ची माहिती मागविली होती. त्याअनुषंगाने दि.१२/०४/२०१६ रोजी सर्व संलग्नित महाविद्यालयांना पत्राद्वारे माहिती त्वरीत देण्याबाबत कळविण्यात आले. माहिती न देणाऱ्या महाविद्यालयांना स्मरणपत्र-१ नुसार माहिती देण्याबाबत कळविले आहे. उर्वरित महाविद्यालयांना माहिती पाठविण्याबाबत स्मरणपत्र-२ नुसार सुचित करण्यात आले आहे. तसेच प्राप्त ८४ महाविद्यालयांपैकी २५ महाविद्यालयांची माहिती विहित नमुन्यात भरण्यात आली आहे.

१७. प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची ई-सुविधा रक्कम रु.३२,८९,०३२/- महाराष्ट्र ज्ञान मंडळ (MKCL), यांना आदा करण्यात आली आहे.

१८. विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल इमारतीच्या मागच्या बाजूस वेल्थ वेस्ट-वर्मी कंम्पोझिट युनिट खत तयार करण्यासाठी शेडची उभारणी पूर्ण झाली आहे.

१९. शै. वर्ष २०१६-१७ पासून पदवीच्या प्रथम वर्षास व पदव्युत्तर वर्गाच्या द्वितीय वर्षास निवड आधारित श्रेयांक प्रणालीनुसार (Choice Based Credit Sytem) तयार केलेले अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. सदरचे अभ्यासक्रम संकेतस्थळावर उपलब्ध केल्याचे महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

२०. बी. ए., बी. एस्सी., तसेच बी. कॉम या अभ्याक्रमाचे निवड आधारित श्रेयांक प्रणालीनुसार, (Choice Based Credit System) आराखडे (Structure) तयार करण्यात आले आहेत.

२१. डॉ. पी. प्रभाकर, डॉ. पी. टी. सावंत व डॉ. ए. बी. नारायणपेठकर याच्याकडून **"प्रा. के. बी. पोवार मेमोरियल गोल्ड मेडल"** या नावाने एम. एस्सी. भूशास्त्र या विषयामध्ये विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस शै. वर्ष २०१५-१६ पासून सुवर्णपदक देण्याकरिता रु. १ लाख देणगी स्विकारण्यात आली.

२२. प्रा. श्रीमती सुलभा शरद पिशवीकर यांच्याकडून **"प्रा. श्री. ना. गोडबोले स्मृती श्रीलीला"** या नावाने इलेक्ट्रॉनिक सायन्स या विषयामध्ये विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस शै. वर्ष २०१५-१६ पासून सुवर्णपदक व रु.१,०००/- रोखीने सुरु करण्यासाठी रु.१ लाख १५ हजार देणगी स्विकारण्यात आली आहे.

२३. सौ. शांताबाई निवृत्ती गायकवाड (स्वकुळसाळी) यांच्याकडून **"सौ. शांताबाई निवृत्ती गायकवाड (स्वकुळसाळी) सुवर्णपदक"** या नावाने एम. ए. भाग १ व २ इतिहास या विषयामध्ये विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस शै. वर्ष २०१५-१६ पासून सुवर्णपदक सुरु करण्यासाठी रु.१ लाख देणगी स्विकारण्यात आली आहे.

२४. शै. वर्ष २०१६-१७ मध्ये विद्यापीठातील विविध संकुल व संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षा दि. ०६/०६/२०१६ ते ०८/०६/२०१६ सोलापूर, पंढरपूर, बार्शी, कोल्हापूर व सातारा या केंद्रांवर घेण्यात आली. एकूण २,३९६ विद्यार्थ्यांनी सदर परीक्षा दिली असून, प्रवेश पूर्व परीक्षेचा निकाल विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे दि. १६/०६/२०१६ व १७/०६/२०१६ एम. ए., एम. कॉम. या अभ्यासक्रमांची प्रवेश पूर्व परीक्षा सोलापूर, पंढरपूर व बार्शी या केंद्रांवर एकूण ४८४ विद्यार्थ्यांकरिता घेण्यात आली.

२५. प्रस्तुत विद्यापीठास एकूण २१० प्रशासकीय पदांचा अकृतीबंध मंजूर झाला असून, त्यापैकी वर्ग ०३ व ०४ संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया मार्च/एप्रिल, २०१६ मध्ये सुरु करण्यात आली होती. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव थांबविण्यात आली होती. ती प्रक्रिया सध्या सुरु करण्यात येऊन प्रथमत: सर्व जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जाचे मेळ घालण्यात आले आहे. दि.१५/०६/२०१६ रोजी मा. कुलगुरु महोदयांनी नामनिर्देशित केलेल्या दैनिकात जाहीर निवेदन प्रसिध्द करण्यात येऊन त्यात दि.२५ व २६ जून, २०१६ रोजी लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली.

२६. शै. वर्ष २०१६-१७ साठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ७७ अन्वये तात्पुरत्या शिक्षक पदांची भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली असून त्या अनुषंगाने संकुलातील प्राप्त कार्यभारानुसार मा. कुलगुरु महोदयांकडून संकुल निहाय शिक्षक पदे निश्चित करुन घेण्यात आले आहे. त्यानुसार बिंदूनिश्चित करुन घेण्यासाठी विद्यापीठाच्या विशेष कक्षास अवगत करण्यात आले आहे.

२७. शै. वर्ष २०१४-१५ मध्ये नियमित पदावर कार्यरत असलेल्या शिक्षकांचे स्वयंमूल्यमापन अहवाल भरुन मागविण्यात आले आहेत. सदर अहवालांचे मा. कुलगुरुमहोदयांनी पुनर्विलोकन केले आहेत. संबंधित अध्यापकांच्या स्वयंमूल्यमापन अहवालात संबंधित संकुलांच्या संचालकानी व मा. कुलगुरुमहोदयांनी पृष्ठांकित केलेले शेरे सर्व संबंधित अध्यापकांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहेत.

२८. वर्ल्ड एज्युकेशन काँग्रेस, मुंबई यांच्याकडून प्रा. डॉ. एन. एन. मालदार यांना "अति प्रभावशाली १०० कुलगुरु" या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

२९. बी. ए., बी. एस्सी. तसेच बी.कॉम. या अभ्यासक्रमाचे निवड आधारित श्रेयांक प्रणालीनुसार (Choice Based Credit System) आराखडे (Structure) तयार करण्यात आले असून सदरचे आराखडे विद्यापीठाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत व आराखडे संकेतस्थळावर उपलब्ध केल्याचे महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

३०. श्रीमती रोहिणी अनिल पंधे यांच्याकडून "Anil Vasantrao Pandhe Gold Medal" या नावाने बी. ई. सिव्हील (स्ट्रक्चरल डिझाईनिंग) या विषयामध्ये विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस शै. वर्ष २०१५-१६ पासून सुवर्णपदक देण्याकरिता रु.१ लाख देणगी स्विकारण्यात आली आहे. त्यामुळे एकूण ३२ सुवर्ण पदकांमध्ये वाढ होवून ती आता ३३ सुवर्ण पदकांपर्यंत झालेली आहे.

३१. अहवाल कालावधीमध्ये अभियांत्रिकी, फार्मसी, बी. एड, बी.पी.एड या अभ्यासक्रमांच्या DTE (DIRECTORATE OF TECHNINCAL EDUCATION, MUMBAI) व प्रवेश नियंत्रण समिती यांच्या कडून प्राप्त झालेल्या याद्या तपासून विद्यार्थ्यांची पात्रता कायम करण्यात आली आहे. कागदपत्रांच्या त्रुटी अभावी DTE (DIRECTORATE OF TECHNICAL EDUCATION, MUMBAI) प्रवेश नियंत्रण समिती यांच्या कडून प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपात पात्र करण्यात आले आहे.

३२. सन २०१५-१६ मधील सोलापूर विद्यापीठाच्या १२ व्या वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी सर्व संलग्नित महाविद्यालयांना विहित नमुन्यात माहिती दि. १० ऑगस्ट, २०१६ पर्यंत पाठविण्याबाबत दि. ०४ जुलै, २०१६ क्र. सोविसो/सांख्यिकी/२०१६-१७/६२१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर एकूण ११ तक्ते व ५ परिशिष्ठे आणि माहिती पाठविण्यासंबंधी सूचना प्रसिध्द करण्यात आल्या. तसेच संलग्नित महाविद्यालयाचे उपलब्ध असलेल्या ई-मेल वर तक्ते पाठविण्यात आले. या वार्षिक अहवालासाठी विद्यापीठातील संकुलांची व प्रशासकीय विभागांची माहिती गोळा करणे आवश्यक असल्यामुळे दि. ०४ जुलै, २०१६ क्र. सोविसो/सांख्यिकी/२०१६-१७/६२१४ च्या पत्रान्वये सर्व संकुलांना सोबत दिलेल्या विहित नमुन्यात माहिती देण्याबाबत सूचित करण्यात आले. संबंधित महाविद्यालयांकडून प्राप्त अहवाल व्यवस्थितरीत्या आहेत का नाहीत हे तपासून घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

३३. मा. श्रीमती मनिषा वर्मा, संचालक व सचिव, State Project Directorate (SPD), RUSA, Maharashtra यांनी दि.०९ मार्च, २०१६ रोजी पाठविलेल्या ई-मेलच्या अन्वये मागविलेली विहित नमुन्यातील माहिती सोलापूर विद्यापीठ पत्र क्र. SUS/Stat/२०१६/६३५८, दि.११ जुलै, २०१६ रोजी ई-मेल द्वारे सादर करण्यात आली आहे.

३४. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये विद्यापीठातील विविध संकुल व संलग्नित महाविद्यालयातील पदव्यूत्तर अभ्यासक्रमास प्रवेशासाठी दि.०९ मे, २०१६ ते १३ जुलै, २०१६ पर्यंत ऑनलाईन प्रवेश परीक्षा पूर्ण करण्यात आली असून एकूण २८८० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. सदर विद्यार्थ्यांची प्रथम व द्वितीय गुणवत्ता फेरी प्रसिध्द करण्यात आली असून त्यानुसार एकूण ८४० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले आहे.

३५. विद्यापीठ संलग्नित सोलापूर शहरातील महाविद्यालयात सुरु असलेल्या कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखेच्या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश केंद्रीय पध्दतीने करण्यात येत असून प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन प्रणाली द्वारे होत असून दि.१४/०६/२०१६ ते १२/०७/२०१६ पर्यंत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून एकूण ६,००५ विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली होती. सदर विद्यार्थ्यांची प्रथम व द्वितीय फेरी पूर्ण झाली असून दि.१३ जुलै, २०१६ पासून ऑनलाईन अर्ज केलेले काही विद्यार्थ्यांना प्रवेश न मिळाल्याने दि.१४ जुलै, २०१६ पासून रिक्त जागांवर महाविद्यालय स्तरावर प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला.

३६. प्रस्तुत विद्यापीठास शिक्षकेत्तर भरती प्रक्रीया अंतर्गत दि.२५ व २६ जून, २०१६ रोजी लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली होती सदर लेखी परीक्षेत गुणानुक्रमे उच्चतम गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या शिपाई या संवर्गातील सामाजिक व समांतर आरक्षणानुसार एकूण ०७ उमेदवारांना नियुक्ती आदेश पारित करण्यात आले आहे.

३७. शै. वर्ष २०१६-१७ साठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ७७ अन्वये तात्पुरत्या शिक्षक पदांची भरती प्रक्रिया पूर्ण करुन विद्यापीठाच्या विविध संकुलात २९ शिक्षक रुजू होवून अध्यापनाचे कार्य सुरु करण्यात आले आहेत.

३८. आस्थापना विभागाच्या पूर्वप्रथेप्रमाणे शै. वर्ष २०१४-१५ अहवालांचे मा. कुलगुरु महोदयांनी पुनर्विलोकन केले आहेत. संबंधित अध्यापकांचया स्वयं मूल्यमापन अहवालात संबंधित संकूलांच्या संचालकांनी व मा. कुलगुरुमहोदयांनी पृष्ठांकित केलेले शेरे संबंधितांना विद्यापीठ परिनियमानुसार अवगत करुन त्यानुसार सर्व संबंधित अध्यापकांना पत्राद्वारे कळविण्यात येवून सदर अहवाल त्यांच्या निदर्शनास आणून स्वाक्षरी घेण्यात आली आहे.

३९. दि.१९ जुलै, २०१६ रोजी गुरुपोर्णिमेचे औचित्य साधून मा. कुलगुरुमहोदयांच्या हस्ते प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संकुलातील संचालक, अध्यापक व संवैधानिक अधिकारी यांचा श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

४०. प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकेत्तर वर्ग ३ व ४ पदांची भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून एकूण ०७ उमेदवारांची विहित प्रक्रियेद्वारे निवड करुन त्यांना शिपाई पदाचे नियुक्ती आदेश पारित करण्यात आले होते. त्यापैकी ०५ उमेदवार शिपाई या पदावर ०१ ग्रंथालय परिचर रुजू झाले आहेत. उर्वरित वर्ग ०३ मधील वेगवेगळ्या ०५ संवर्गातील पदांची व्यावसायिक चाचणी दि.२३ व २४ जुलै, २०१६ रोजी घेवून दि.०३/०८/२०१६ रोजी लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेनंतर गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांची संभाव्य यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून दि.०४/०८/२०१६ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत हरकती मागविण्यात आल्या होत्या. पुढील प्रक्रिया सुरु आहे.

४१. शै. वर्ष २०१६-१७ साठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ७७ अन्वये रसायनशास्त्र व भूशास्त्र संकुलातील विहित प्रक्रियेद्वारे ०७ पदे भरण्यात आली असून त्यापैकी ०५ शिक्षक संबंधित संकुलात रुजू झाले आहेत.

४२. ०१ ऑगस्ट, २०१६ हा विद्यापीठाचा १२ वा वर्धापन दिन अतिशय उल्हासपूर्ण वातावरणात पार पडला सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. एन. एन. मालदार, कुलगुरु हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून मा. डॉ. वासुदेव गाडे, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विविध क्षेत्रात गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देवून तसेच गुणवंत शिक्षक, गुणवंत कर्मचारी, आदर्श प्राचार्य, आदर्श महाविद्यालय हे पुरस्कार वितरण करण्यात आले

तर विद्यापीठाचा अत्यंत मानाचा असा समजला जाणारा दुसरा जीवनगौरव पुरस्कार सोलापूर जिल्ह्याचे सुपुत्र, ज्येष्ठ साहित्यिक, थोर समीक्षक, मर्मविनोदकार मा. प्रा. गो. मा. पवार यांना अध्यक्ष व पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम रु.२५,०००/-, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे होते.

४३. शै. वर्ष २०१५-१६ मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे (एस.बी.सी.) एकूण ३८ विद्यार्थ्यांची रु.२,५३,६६०/- इतकी रक्कम प्राप्त झाली असून सदरची रक्कम विद्यार्थ्यांच्या नावे फी पोटी वर्ग करण्यासाठी वित्त व लेखा विभागाकडे कळविण्यात आले आहे.

४४. अहवाल कालावधीत शै. वर्ष २०१६-१७ साठीचे पात्रता अर्जासंदर्भातील नियम, पात्रता शुल्क व तारखासंदर्भातील परिपत्रक तयार करुन महाविद्यालयांना पाठविण्यात आले होते. परंतु बी. ए., बी.कॉम. व बी.एस्सी. या अभ्यासक्रमासाठी प्रवेशांच्या तारखा वाढविण्यात आल्यामुळे सदर अभ्यासक्रमांच्या तसेच पदव्युत्तर पात्रता अर्जासंदर्भातील तारखांमध्ये बदल करण्यात आला असून सदर तारखा बदलाचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर महाविद्यालयांना माहितीस्तव उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

४५. अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१५-१६ करीता प्रवेशित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र, एम.ए. (सर्व विषय), एम.कॉम., एम.एस्सी. (सर्व विषय), एम.सी.ए., पी.जी.डी.सी.ए., डी.बी.एम., एम.एस.डब्ल्यू, एम.बी.ए. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील त्रुटी संबंधित महाविद्यालयांना व विद्यापीठातील संकुलांना ३१/१२/२०१५ पुर्वी ऑनलाईन कळविण्यात आल्या होत्या. परंतु सदरील मुदतीनंतर त्रुटींची पूर्तता केलेल्या व पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची रु.५००/- प्रमाणे दंडाची रक्कम आकारणी करुन पात्रता कायम करण्यात येत आहे.

४६. अहवाल कालावधीमध्ये अभियांत्रिकी, फार्मसी, बी. एङ, बी.पी.एङ या अभ्यासक्रमांच्या DTE (Directorate of Technical Education, Mumbai) व प्रवेश नियंत्रण समिती यांच्या कडून प्राप्त झालेल्या याद्या तपासून विद्यार्थ्यांची पात्रता कायम करण्यात आली आहे. कागदपत्रांच्या त्रुटी अभावी DTE (Directorate of Technical Education, Mumbai) प्रवेश नियंत्रण समिती यांच्या कडून प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपात पात्र करण्यात आले आहे.

४७. शै. वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ मध्ये एम. फील., पी.एच.डी. या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची तपासणी करुन ज्या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या कागद पत्रांची पूर्तता केली नाही अशा विद्यार्थ्यांच्या नावांची यादी तसेच पात्र विद्यार्थ्यांच्या नावांच्या याद्या देखील संबंधित महाविद्यालयांना अणि महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.) यांच्याकडे पाठविण्यात आल्या आहेत.

४८. शै. वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ मध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी व शिक्षणशास्त्र या विद्याशाखांतील अभ्यासक्रमांस प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची तात्पुरती पात्रता करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता महाविद्यालयांकडून झाल्याने सदर विद्यार्थ्यांची पात्रता कायम करुन त्याचे निकाल प्रसिध्द करण्याबाबत परीक्षा विभागास कळविण्यात येत आहे.

४९. इतर विद्यापीठामधून प्रथम व द्वितीय वर्ष पूर्ण करुन आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रस्तुत विद्यापीठात प्रवेश देणे संदर्भात संबधित महाविद्यालयांना विद्यापीठाची मान्यता घेण्यासाठी पत्र पाठविले आहे त्या पत्रावर कार्यवाही सुरु आहे.

५०. शै. वर्ष २०१६-१७ करीता प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ संकुलातील कर्मचाऱ्यांसाठी पात्रता विभागामार्फत प्रवेश, पात्रता व परीक्षेसंबंधीचे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.२०/०७/२०१६ रोजी घेण्यात आले.

५१. इतर विद्यापीठातून प्रस्तुत विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या विषयी तयार केलेली नियमावली अद्यावत करण्यासाठी सर्व विद्याशाखांच्या मा. समन्वयकांची बैठक २५/०७/२०१६ रोजी आयोजित करुन सदर नियमावली अद्यावायत करण्यासंबंधी प्रक्रिया चालू आहे.

५२. दरवर्षीप्रमाणे देण्यात येणारा “राजर्षी शाहू महाराज पुरस्कार २०१६” हा सामाजिक शास्त्रे संकुलातील श्री. समाधान शामराव भोरकडे या विद्यार्थ्यास प्रदान करण्यात आला असून पुरस्कारासाठी रोख रक्कम रु.५,०००/- विद्यापीठाचे प्रशस्तीपत्रक व स्मृतीचिन्ह देवून दि.०१ ऑगस्ट, २०१६ विद्यापीठ वर्धापन दिनी गौरविण्यात आले.

५३. सर्व विद्याशाखेतील काही विषयांचे अभ्यासक्रम निवड आधारित श्रेयांक प्रणाली (CBCS) नुसार तयार करुन विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले तसेच महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे देखील कळविण्यात आले.

५४. दि.०३/०८/२०१६ रोजी डॉ. माधुरी उमाकांत वाळवेकर, वाळवेकर नर्सिंग होम सोलापूर यांनी एम.एस्सी. संख्याशास्त्र या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस “श्रीमती सुलभा शंकर पांडे” यांच्या नावाने सुवर्णपदक सुरु करण्यासंदर्भात विद्यापीठास धनादेशाद्वारे रु.१,०६,०००/- हस्तपोच दिले आहेत सदर देणगीनुसार सुवर्णपदक प्रदान करण्यासाठीची कार्यवाही सुरु आहे.

५५. विद्यापीठातील विविध संकुल/विभाग व अतिथीगृहामध्ये (रुसा अंतर्गत) नऊ ए.सी. खरेदी करुन बसविण्यासंबंधात देण्यात आलेल्या वर्क ऑर्डरप्रमाणे ए.सी. प्राप्त झालेले आहेत.

**"ब" महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.) विभाग:**

१. शिक्षक मान्यता विभागाने अहवाल कालावधीत माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या एकूण ७ अर्जावर कार्यवाही करुन संबंधितास माहिती देण्यात आली असून पाच अपील अर्जावर कार्यवाही करण्यात आली आहे.

२. शै.वर्ष २०१६-१७ पासून नवीन महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, विद्याशाखा सुरु करण्याकरीता प्राप्त प्रस्तावांवर विहीत कार्यवाही करुन सर्व पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासन, मा.शिक्षण संचालक (उ.शि.), शिक्षण सहसंचालक यांच्याकडे पुढील कार्यवाहीकरीता सादर करण्यात आलेले आहेत.

३. शै.वर्ष २०१६-१७ च्या नैसर्गिक विस्ताराकरीता प्राप्त प्रस्तावांवर विहीत कार्यवाही करुन मा.शिक्षण संचालक (उ.शि.) पुणे, मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे, मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, वेस्टर्न रिजनल ऑफीस, ए.आय.सी.टी.ई., चर्चगेट, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहे.

४. प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित ४० अनुदानित महाविद्यालयांचे व प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुलांचे शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यमापन करण्याकरीता समित्या नियुक्त करण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार सर्व समित्यांनी भेटी दिलेल्या आहेत. सदरच्या सर्व समित्यांकडून अहवाल प्राप्त झालेले असून सदर अहवालांची छाननी करण्याकरीता नियुक्त त्रिसदस्यीय समितीचे अहवाल प्राप्त झालेले असून संलग्नित ४० अनुदानित

महाविद्यालयांचे व प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुलांचे शैक्षणिक व प्रशासकिय मूल्यमापन करुन अंतिम गुण व श्रेणी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

५. शै.वर्ष २०१६-१७ च्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करुन तसेच सर्व संलग्नित महाविद्यालये, विद्यापीठातील सर्व संकुले व विद्यापीठातील सर्व प्रशासकीय विभागाकडे पाठविण्यात आलेले आहेत.

६. शै.वर्ष २०१७-१८ पासून नवीन महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम व विद्याशाखा सुरु करण्याकरीता संस्था / महाविद्यालयांकडून प्रस्ताव स्विकारण्याकामी शै.वर्ष २०१७-१८ चा अल्पकालिन बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

७. २६७ अध्यापक पदासाठी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, स्थानिक निवड समिती अहवालावर योग्य ती कार्यवाही करुन संबंधित महाविद्यालयास मान्यता असल्याचे कळविण्यात आले.

८. ३ महाविद्यालयांना नियमित अध्यापक व प्राचार्य पदाच्या भरतीसाठी महाविद्यालयामार्फत प्राप्त छाननी समितीच्या अहवालानुसार महाविद्यालयास मा. कुलगुरू प्रतिनिधी, मागासवर्गीय प्रतिनिधी व विषयतज्ञ कळविण्यात आले. शासनामार्फत प्राप्त दोन पत्रावर कार्यवाही करण्यात आली आहे.

९. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादा वाढीसंदर्भात महाविद्यालयामार्फत प्राप्त एका प्रस्तावावर आढावा समितीची बैठक घेवून समितीने शिफारस केल्यानुसार अहवाल मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांच्या मार्फत शासनास पाठविण्यात आला.

१०. २७ अध्यापक पदासाठी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, विद्यापीठ निवड समिती अहवालावर योग्य ती कार्यवाही करुन संबंधित महाविद्यालयास कायम मान्यता असल्याचे कळविण्यात आले.

११. संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, विद्यापीठ विहित निवड समिती अहवालानुसार संबंधित महाविद्यालयातील एक प्राचार्यास मान्यता देण्यात आली आहे.

१२. संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, संबंधित महाविद्यालयातील रिक्त नियमित प्राचार्य पदी दोन प्रभारी प्राचार्यास मान्यता देण्यात आली आहे.

१३. कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी यांना यु.जी.सी. ११ व्या पंचवार्षिक योजनेतंर्गत मंजूर झालेल्या इमारतीच्या बांधकामाचा पूर्णत्व दाखला (Completion Certificate) यु.जी.सी., डब्ल्यु. आर. ओ., पुणे येथे पाठविण्यात आला आहे.

१४. मागील शिबिरामध्ये स्थाननिश्चिती समितीने शिफारस न केलेल्या सहाय्यक प्राध्यापकांचे स्टेज- २ व ३ मध्ये स्थाननिश्चितीकरिता विद्यापीठ अनुदान आयोग अधिसूचना दि.३० जून, २०१० मधील तरतूदीनुसार विषय निहाय विषयतज्ञांची नांवे देण्यात आली आहे.

१५. प्रस्तुत विद्यापीठातून विद्यार्थ्यांची पीएच.डी. साठी मौखिक परीक्षा झाली आहे; व एकूण २० विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी उत्तीर्ण म्हणून घोषित करण्यात आले.

१६. प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शा.शि.संचालकांची रिक्त पदे भरण्यासाठी प्राप्त झालेल्या दहा प्रस्तावांची तपासणी करुन जाहिरातीच्या मसूद्यास मान्यता देण्यात आली आहे.

१७. संलग्न अनुदानित महाविद्यालयातील दोन शिक्षक व एक शिक्षकेत्तर पदाची व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील नऊ शिक्षक व चार शिक्षकेत्तर पदांची बिंदूनामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी करुन देण्यात आली.

१८. या विभागात सहाय्यक प्राध्यापक पदासाठी दि.२९ मार्च, २०१६ ते ११ मे, २०१६ अखेर २० मागासवर्गीय उमेदवारांनी नाव नोंदणी केलेली आहे. तसेच एका मागासवर्गीय उमेदवारांची अधिकच्या पात्रतेची नोंद घेण्यात आली आहे. नाव नोंदणी केलेल्या मागासवर्गीय पात्र उमेदवारांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली आहेत.

१९. व्यवस्थापन परिषदेने पारित केलेल्या ठरावानुसार, सन २०१६-१७ पासून संलग्न महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमधून गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार देण्यासाठी मा. कुलगुरुमहोदयांनी गठीत केलेल्या समितीकडून सदर पुरस्कारासाठी तयार करण्यात आलेली नियमावली व अर्जाचा नमुना इ. व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर करण्यात आला आहे.

२०. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता नवीन अभ्यासक्रमासाठी संलग्निकरण व संलग्निकरणाच्या नुतणीकरणाचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सदरच्या प्रस्तावांची छाननीसमितीमार्फत छाननी होऊन छाननी समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

२१. संलग्न महाविद्यालयांना सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी युपीएससी, एमपीएससी, बँकींग परीक्षा, स्टाफ सिलेक्शन आणि इतर परीक्षेसाठी करिअर गाईडन्स व्याख्यान आयोजनाकरिता प्रोत्साहनात्मक काही अंशी अनुदान मागणीचे प्रस्ताव विहित मुदतीत दि.३०/०६/२०१६ पर्यंत पाठविण्याबाबत विद्यापीठ पत्र क्र. सोविसो /म.वि.वि.मं./ वि.क./ ५०९७, दि.०२ जून, २०१६ अन्वये कळविण्यात आले.

२२. या कालावधीत प्रस्तुत विद्यापीठातून ३ विद्यार्थ्यांची एम.फिल. साठी मौखिक परीक्षा झाली; व विद्यार्थ्यांना एम. फिल पदवी प्रदान करण्यात आली.

२३. उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांचे २(f) & १२ (B) चे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली या कार्यालयास मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहेत.

२४. वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील ५ शिक्षकांचे सहाय्यक प्राध्यापकांचे स्टेज १ ते २ व स्टेज २ ते ३ (CAS Promotion) मध्ये स्थाननिश्चिती करण्यात आलेली आहे.

२५. प्रस्तुत विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शा.शि. संचालकांची रिक्त पदे भरण्यासाठी प्राप्त झालेल्या सात प्रस्तावांची तपासणी करुन जाहिरातीच्या मसुद्यास मान्यता देण्यात आली व या सर्व जाहिराती विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Employment Opportunities या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

२६. प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित पाच कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक पदांच्या बिंदुनामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी करुन देण्यात आली.

२७. शिक्षकेत्तर "गुणवंत कर्मचारी पुरस्कार" २०१६ साठी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त प्रस्तावांची मा. कुलगुरु महोदयांनी गठित केलेल्या समितीकडून छाननी करण्यात आली व समितीने केलेल्या शिफारशीनुसार डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयातील श्री. सुर्यकांत माणिकराव छत्रबंद यांना विद्यापीठाच्या १२ व्या वर्धापनदिनी दि.०१ ऑगस्ट, २०१६ रोजी सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. एन. एन. मालदार, व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. वासुदेव गाडे यांच्या हस्ते "गुणवंत कर्मचारी पुरस्कार" प्रदान करण्यात आला.

२८. शै. वर्ष २०१६-१७ च्या विद्यार्थी प्रवेशासाठी विद्यापीठ संकुलांकडून विद्यार्थी प्रवेश मंजूर संख्येनुसार तयार केलेला आरक्षण तक्ता तपासणी करुन देण्यात आला.

२९. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादा वाढीसंदर्भात महाविद्यालयामार्फत प्राप्त एका प्रस्तावावर आढावा समितीची बैठक घेऊन समितीने शिफारस केल्यानुसार समितीचा अहवाल मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या मार्फत शासनास पाठविण्यात आला.

३०. संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, विद्यापीठ विहित निवड समिती अहवालानुसार संलग्नित महाविद्यालयातील एकूण चार प्राचार्यांना मान्यता देण्यात आली.

३१. संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, संबंधित महाविद्यालयातील रिक्त नियमित प्राचार्य पदी दोन प्रभारी प्राचार्यास मान्यता देण्यात आली.

३२. शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज यांचा Construction of Science Laboratory Building चा प्रस्ताव डब्लू. आर. ओ., युजीसी, पुणे येथे मंजूरीकरिता पाठविण्यात आला.

३३. संलग्नित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांचे गुणवत्तेवर आधारित सहाय्यक प्राध्यापक संवंर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नतीकरिता निवड समिती देण्यात आली.

३४. नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील ६ सहाय्यक प्राध्यापकांचे सहयोगी प्राध्यापक म्हणून पद नामात बदल करुन महाविद्यालयास कळविण्यात आले.

३५. सन २०१६ करीता उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारासाठी शहरी व ग्रामीण विभागातून प्रस्ताव मागविण्यात आले व विद्यापीठ वर्धापन दिनी १ ऑगस्ट, २०१६ रोजी "उत्कृष्ट महाविद्यालय" पुरस्कार शहरी विभागामधून डी.पी.बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर व ग्रामीण विभागामधून शंकरराव माहिते महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयांना देण्यात आले.

३६. सन २०१६ करीता "सोलापूर विद्यापीठ जीवन गौरव पुरस्कार" करिता प्रस्ताव मागविण्यात आले असून सदरबाबत छाननी समितीचे आयोजन करुन सदरचे बैठकीसमोर विषय ठेवण्यात आलेला आहे.

३७. अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम / विषय / अतिरिक्त तुकड्या / विद्याशाखा शै. वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यास शासनाची मान्यता मिळालेली असून सदर नवीन अभ्यासक्रम / विषय / तुकडी / विद्याशाखा यांना संलग्निकरण देण्याची कार्यवाही सुरु आहे.

३८. दि.१८ जून ते १४ जुलै, २०१६ या कालावधी मध्ये सर्व विद्याशाखामधील संशोधन व मान्यता समितीच्या बैठका घेण्यात आल्या.

३९. प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित एका अनुदानित (शिक्षकेत्तर पदाची) व पाच कायम विनाअनुदानित (शिक्षक पदांची) बिंदुनामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी करुन देण्यात आली.

४०. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, स्थानिक निवड समिती अहवालावर योग्य ती कार्यवाही करुन संबंधित महाविद्यालयास मान्यता असल्याचे कळविण्यात आले. (एकूण १३ अध्यापकांना)

४१. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त विद्यापीठ विहित निवड समितीमार्फत प्राप्त शिफारशीनुसार ३३ शिक्षकांना परिविक्षाधीन कालावधीसाठी मान्यता देण्यात आली आहे.

४२. संलग्नित महाविद्यलयाकडून प्राप्त झालेल्या विद्यापीठ विहित निवड समिती अहवालानुसार संलग्नित महाविद्यालयातील एका प्राचार्यास मान्यता देण्यात आली.

४३. संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या संबंधित महाविद्यालयातील रिक्त नियमित प्राचार्य पदी दोन प्रभारी प्राचार्यास मान्यता देण्यात आली.

४४. महाविद्यालयातील शिक्षकांची यादी अद्ययावत करण्यासाठी परिपत्रकाद्वारे Google Form मध्ये माहिती भरण्याबाबत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

४५. शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यमापनाच्या दुसऱ्या टप्प्याच्या कार्यवाहीस सुरुवात केलेली आहे.

४६. छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयातील श्री. सोनकांबळे ए. व्ही. (इतिहास) यांना सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नती देण्यात आली.

४७. संगणकशास्त्र संकुल अंतर्गत असलेल्या संख्याशास्त्र विभागाचा One day Seminar on Creating Awareness about Official Statistics बाबतचा प्रस्ताव The Director, NSSTA CSO, MoSPI, New Delhi यांच्याकडे पाठविण्यात आला.

४८. IQAC (Internal Quality Assurance Cell) च्या बैठकीचे आयोजन दि.१३/०७/२०१६ रोजी करण्यात आले.

४९. RUSA अंतर्गत Bhuvan RUSA च्या बैठकीचे आयोजन दि. २७/०७/२०१६ रोजी करण्यात आले.

५०. RUSA अंतर्गत “Two Day Residential Workshop on Academic Autonomy” या दोन दिवसीय निवासी कार्यशाळेसाठी दि. ०१/०८/२०१६ व ०२/०८/२०१६ रोजी कलिना कॅम्पस, मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे मा. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. आर. एस. हेगडी, प्रा. व्ही. पी. उबाळे, डी.बी.एफ. दयानंद महाविद्यालय, प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, प्राचार्य डॉ. ए. एच. माणिकशेटे, वालचंद महाविद्यालय, प्राचार्य डॉ. डी. डी. पुजारी, संगमेश्वर महाविद्यालय, प्राचार्य डॉ. पी. आर. थोरात, श्री शिवाजी महाविद्यालय, प्राचार्य एस. के. वडगबाळकर, डी.बी.एफ. दयानंद महाविद्यालय, प्रा. डी. एम. मेत्री, संगमेश्वर महाविद्यालय हे उपस्थित राहिले.

५१. प्रा. व्ही. बी. पाटील, पदार्थविज्ञान संकुल व डॉ. अे. अे. घनवट, रसायनशास्त्र संकुल यांना SPD-RUSA यांच्या कडून संशोधन व नविन्यपूर्ण उपक्रम या घटकाअंतर्गत १५ लाखांचा निधी प्राप्त झाला.

५२. प्रा. व्ही. बी. पाटील, पदार्थविज्ञान संकुल यांच्या SPD-RUSA च्या “कणाद” (Kan-nad) या ऑनलाईन प्लॅटफार्मसाठी विद्यापीठाच्या Innovation Co-ordinator पदी नियुक्ती झाली.

**"क" परीक्षा विभाग:**

१. प्रस्तुत विद्यापीठाचा ११ वा दिक्षांत समारंभ शुक्रवार दि. १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी संपन्न झाला या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रख्यात अर्थतज्ञ व मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु तथा राज्यसभा सदस्य प्रा. भालचंद्र मुणगेकर उपस्थित होते. मा. कुलगुरु प्रा. डॉ. एन. एन. मालदार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आल्या. या समारंभात विविध विषयात गुणवत्ता प्राप्त केलेल्या एकूण २८ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदकाने गौरविण्यात आले. तसेच ८२ विद्यार्थ्यांना विद्या वाचस्पती (पी.एच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. या प्रसंगी एकूण २४,६१६ इतके स्नातक पदवी प्राप्त करण्यात पात्र होते.

२. या वर्षीच्या प्रदान करण्यात आलेल्यापदवी प्रमाणपत्रांना डी मॅटिंग केलेले असून सदर प्रमाणपत्रावर QR-QC Code, Gold Fiol, Embossing इत्यादी सुरक्षा विषयक उपया योजनांची छपाई करण्यात आलेली आहे. सदर प्रमाणपत्र हे Tear Resistant, Waterproof असून हे प्रमाणपत्र A४ Size Teslin Paper वर छपाई करण्यात आलेले आहे. असे प्रमाणपत्र देणारे सोलापूर विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले असून अनुपस्थित विद्यार्थ्यांना त्वरीत त्यांच्या लॉगीन मध्ये याची रंगीत कॉपी प्रिंट करता येईल.

३. राजेश अग्रवाल समितीच्या विद्यापीठ निहाय शिफारशींच्या अमंलबजावणीच्या अनुषंगाने विद्यापीठानी आतापर्यंत काय कार्यवाही केली या संदर्भात दि. ९ मार्च, २०१६ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मुंबई विद्यापीठात बैठक आयोजित केली होती सदर बैठकीस प्रस्तुत विद्यापीठाचे मा. परीक्षा नियंत्रक आणि मा. कुलसचिव उपस्थित होते.

४. प्रस्तुत विद्यापीठाच्या गेल्या ०३ परीक्षेच्या वेळा पासून सुरु करण्यात आलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या (बी.एड, बी.पीएड, एम.एड, एम.पी.एड. / अभियांत्रिकी, एम.सी.ए. व एम.बी.ए.) या परीक्षांना Online DEPDS प्रश्नपत्रिका या प्रणालीद्वारे जवळपास ३० परीक्षा केंद्रांवर पेपर सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर Online पध्दतीने प्रश्नपत्रिका पाठविण्यास दि.२५ एप्रिल, २०१६ पासून यशस्वीरित्या सुरुवात झाली. अभियांत्रिकी विद्याशाखांच्या सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिका या स्पर्धा परीक्षा, MPSC/UPSC, GATE या धर्तीवर वेगवेगळ्या चार संचात तयार करण्यात येत आहेत.

५. मार्च / एप्रिल २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या कला विद्याशाखांतर्गत बी. ए. भाग १ व ३, बी. कॉम. भाग-१ आणि एम. ए. च्या सर्व अभ्यासक्रमांचे निकाल ३० दिवसांत जाहीर करण्यात आले आहेत. या सर्व जाहीर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचा निकाल विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. विशेष बाब म्हणजे बी.बी.ए. भाग-१, २, ३ व पी. जी. डी.सी.ए. या अभ्यासक्रमांचे निकाल केवळ १४ ते १५ दिवसात जाहिर करण्यात आले. तसेच अभियांत्रिकी द्वितीय वर्ष व अंतिम वर्ष या अभ्यासक्रमांसह B. Architecture, B. Pharmacy सह सर्व परीक्षांचे निकाल ३० दिवसांत जाहीर करण्यात आले. अशा प्रकारे एप्रिल/मे २०१६ मधील सर्व ५५२ परीक्षांचे निकाल हे ३० दिवसाच्या आत जाहिर करण्यात आले.

६. २५ मे, २०१६ रोजी संपलेल्या अभियांत्रिकी परीक्षांचे सर्व निकाल ३० दिवसांत जाहिर करण्यात आले. अभियांत्रिकी विद्याशाखेच्या प्रथम वर्ष अभ्यासक्रमांचे निकाल अवघ्या १८ दिवसात जाहिर करण्यात आले. हे सर्व निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहेत. तंत्र शिक्षण विभागाने अभियांत्रिकी विद्याशाखेचे प्रथम वर्षाचे निकाल १५ जून पर्यंत जाहीर करावेत असे निर्देश सर्वच विद्यापीठांना दिलेले आहेत. त्यापूर्वीच सोलापूर विद्यापीठाने दि.०३ जून, २०१६ रोजी अभियांत्रिकी विद्याशाखेच्या प्रथम वर्ष अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करुन अभियांत्रिकी प्रथम वर्ष निकाल जाहीर करण्यामध्ये महाराष्ट्रातील सर्व अकृषि विद्यापीठामधून सर्व निकाल प्रथम जाहीर करण्यात बाजी मारली आहे. प्रथम वर्षाचा निकाल लवकर जाहीर झाल्यामुळे अभियांत्रिकी विद्याशाखेच्या द्वितीय वर्ष प्रवेश सुलभ होवून विद्यार्थ्यांच्या इतर सर्व समस्या दूर होतील.

७. दि.०६ ते ०८ जून, २०१६ या कालावधी मधील पदव्युत्तर प्रवेश परीक्षा सुरळीत पार पडल्या. या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशा करिता प्रवेश परीक्षा ह्या O.M.R. उत्तरपत्रिकेद्वारे घेण्यात येते. परीक्षा संपल्यानंतर सदर प्रश्नपत्रिकेच्या उत्तरसूची (Answer Keys) व विद्यार्थ्यांच्या स्कॅन झालेल्या O.M.R. उत्तरपत्रिका ह्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर

प्रसिध्द करण्यात आल्या. तसेच उत्तरसूचीतील त्रुटीबाबत विद्यार्थ्यांकडून प्राप्त हरकतीचे निराकरण करुन या परीक्षांचे अंतिम निकाल जाहीर करण्यात आले. यामुळे सदर प्रवेश परीक्षांच्या निकालाची प्रक्रिया ही दोषमुक्त व त्रुटी विरहीत आणि अत्यंत पारदर्शक राहिली आहे. प्रवेश परीक्षांसाठी अशी पध्दत अवलंब करणारे सोलापूर विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ आहे.

८. दि.१८ जुलै रोजी एम. ए. इतिहास व अर्थशास्त्र या विषयाची फेर प्रवेश परीक्षा (Re-Entrance) घेण्यात आली आहे.

९. दि.२५ व २९ जुलै रोजी अनुक्रमे एम.कॉम. व बी.बी.ए. / बी. सी.ए. / बी. एस्सी. (ECS) या विषयाची फेर प्रवेश परीक्षा (Re-Entrance) सुरळीत पार पडली.

१०. आगामी ऑक्टोबर / नोव्हेंबर, २०१६ च्या परीक्षे करीता प्राश्निक, परीक्षक, परिनिरीक्षक यांच्या याद्या ३२ (५) पॅनल तयार करुन घेण्यासाठी अभियांत्रिकी व शिक्षण शास्त्र विद्याशाखांच्या ३२ (५) बैठका आयोजित करण्यात आल्या.

११. विद्यापीठ परीक्षा विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेल्या विद्यार्थी सहाय्यता केंद्राकरिता नव्याने तयार करण्यात अलेल्या स्वतंत्र कक्षाचे उदघाटन मा. डॉ. वासुदेव गाडे, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या हस्ते करण्यात आले.

१२. बहिस्थ विद्यार्थ्यांच्या Online Payment द्वारे Online Admission आवश्यक प्रक्रिया करण्यात येत आहे.

**"ड" वित्त व लेखा विभाग:**

१. प्रस्तुत विद्यापीठाचे सन २००८-०९ पासून सन २०१२-१३ पर्यंत विक्रीकर विभाग यांच्याकडून व्यवसायकर निर्धारण पूर्ण करण्यात आले असून तसे त्यांचे प्रमाणपत्र विद्यापीठास प्राप्त झाले आहे.

२. मा. प्रधान महालेखाकार, मुंबई यांचे कार्यालयाकडून प्रस्तुत विद्यापीठाचे सन २०१०-११ ते २०१४-१५ पर्यंतचे लेखापरीक्षण पूर्ण करण्यात आले आहे.

३. राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (RUSA) अंतर्गत विद्यापीठास रु.४.७२ कोटी इतके अनुदान प्राप्त झाले आहे.

४. उच्च शिक्षण, मुंबई यांनी कळविल्यानुसार मा. महालेखापाल यांचा सन २००४-०५ ते २००९-१० या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणामधील आक्षेपांचा पुर्तता अहवाल (सहामाही लेखापरिक्षण अहवाल दि.३०/०६/२०१६ ते ३१/१०/२०१६ पर्यंत) मा. कक्ष अधिकारी, सा. शि. २, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, मा. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय मध्यवर्ती इमारत, पुणे, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर व तसेच मा. लेखाधिकारी, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांना पाठविण्यात आलेले आहे.

५. मा. महालेखापाल कार्यालयाकडून महालेखापाल कार्यालयाने केलेल्या दि.२३/०२/२०१६ ते ३०/०६/२०१६ या कालावधीत सन २०१०-११ ते २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षणामधील आक्षेपांची पुर्तता करण्यासाठी सर्व संबंधित विभागांना कळविण्यात आले आहे. आक्षेपांची पुर्तता अहवाल तयार करण्यात आला असून मा. महालेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे.

६. सन २०१५-१६ च्या विद्यापीठाशी संवैधानिक लेखापरिक्षण पूर्ण झाले असून लेखापरिक्षण अहवाल वित्त व लेखा समितीच्या बैठकीसमोर ठेवण्यात आला असून लेखापरिक्षण अहवालास वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषद यांनी मान्यता दिली असून दि.२६/०८/२०१६ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीसाठी विषय सादर करण्यात आला आहे.

७. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता प्रयोगशाळेसाठी आवश्यक असलेले रसायनेची खरेदी, टोनर रिफिलिंग, दुरुस्ती व ॲन्टी व्हायरस खरेदी इ. व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्यानुसार वार्षिक दरकरार करण्याचे काम पूर्ण झालेले आहे व त्यानुसार खरेदी व दुरुस्तीची प्रक्रिया सुरु आहे.

**"ई" संकुले व ग्रंथालय:**

१. रसायनशास्त्र संकुलाकडे नेट / सेट कार्यशाळेचे दि.१७/०२/२०१६ करण्यात आलेले होते. सदर कार्यशाळेस डॉ. एच. ए. परबत मुंबई यांना फिजीकल केमिस्ट्रि व डॉ. एच. व्ही. चव्हाण, देवरुख यांना ऑरगॅनिक केमिस्ट्रि या विषयासाठी पाहुणेव्याख्याते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

२. रसायनशास्त्र संकुलाकडे आवश्यक असणारी उपकरणे रुसा अंतर्गत खरेदी करण्यासाठीचे ई-टेंडर विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

३. रसायनशास्त्र संकुलातील एम.एस्सी भाग-१ शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या प्रवेशासाठी प्रथम कौन्सेलिंग राऊंड २७/०६/२०१६ व द्वितीय कौन्सेलिंग राऊंड ०४/०७/२०१६ रोजी संकुलामध्ये घेण्यात आला. त्यावेळी संकुलात एम.एस्सी भाग-१ मध्ये एकूण ७० व एम.एस्सी भाग-२ मध्ये एकूण ५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

४. रसायनशास्त्र संकुलामधील एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांसाठी शनिवार, दि.०९/०७/२०१६ रोजी Mr. Clement Ravet, France या परदेशी पाहुण्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

५. पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र संकुलाकडे दि.३०/०३/२०१६ रोजी संकुलाचे शैक्षणिक मुल्यमापन करण्यासाठी आलेल्या AAA समितीने भेट दिली.

६. RUSA च्या Inovative Practices & Technology Transfer या सदराखाली आलेल्या समितीने विद्यापीठास व संकुलास दि.०५/०५/२०१६ रोजी भेट दिली. समिती समोर विद्यापीठातील प्राध्यापकांकडून एकूण पाच प्रस्ताव सादर केले.

७. पदार्थविज्ञान संकुलाकडील प्रा. एल. पी. देशमुख यांनी नीट परीक्षेच्या कामकाजाकरिता (CVSE-NEET, Nagpur) दि.०१/०५/२०१६ रोजी नागपूर येथे सहभाग नोंदविला.

८. पदार्थविज्ञान संकुलाकडील एम. एस्सी. भाग-१ [Physics (App. Electronic & Materials Science), Electronic Science] ची प्रवेश प्रक्रीया नियमित वेळापत्रकानुसार पार पाडली.

९. दि.१ ऑगस्ट, २०१६ रोजी विद्यापीठाच्या वर्धापन दिन समारंभात प्रा. एस. एस. सुर्यवंशी, संचालक, पदार्थविज्ञान संकुल, यांना विद्यापीठाचा “गुणवंत शिक्षक” पुरस्कार प्रदान करण्यात आला.

१०. संकुलाकडे प्रत्येक बुधवारी सायंकाळी ०४:०० ते ०६:०० दरम्यान प्रधानमंत्री यांचे भारत स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छता मोहिम राबवून परिसर स्वच्छ करण्यात येतो.

११. दि.१४ मार्च, २०१६ रोजी संगणक संकुलामार्फत B.C.A., B.Sc. (ECS), M.C.A., M.Sc. Computer Science & B.E. या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांकरीता SEED IT-Idol Computation-२०१६ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातून ४००० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला होता. स्पर्धेच्या द्वितीय आणि तृतिय फेरी करीता एकूण ३२५ विद्यार्थी पात्र ठरले.

१२. संगणकशास्त्र संकुलाच्यावतीने दि.१९ व २० मार्च, २०१६ रोजी "Recend Trend in Data Warehousing and Data Mining" या विषयावर आधारित राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेस प्रस्तुत विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागाकडील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

१३. शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र विभागामार्फत SAP अंतर्गत दि.०९/०५/२०१६ ते २७/०५/२०१६ दरम्यान आयोजित “Project Work Training” साठी संख्याशास्त्र विभागातील श्री. पवार दिग्विजय हरिदास व श्री. पाटील सुयोग हणमंत या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

१४. संगणकशास्त्र संकुलाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी दि.०४/०८/२०१६ रोजी Reseach and Employment Avenues in Computational Sciences या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. याकरीता Dr. B. V. Dhandra, Gulbarga University, Gulbarga यांना आमंत्रित करण्यात आले होते.

१५. प्रस्तुत विद्यापीठातील पुरातत्वशास्त्र विभागाच्यावतीने दि.१० मार्च, २०१६ रोजी श्री महेश कालरा, मुंबई यांचे भारतीय नाणकशास्त्र या विषयावर एकदविसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस इतिहास आणि पुरातत्वशास्त्र विभागातील एम.ए. भाग-१ व २ मधील एकूण ५० विद्यार्थ्यांना व शहरातील २० संशोधकांनी सहभाग नोंदविला.

१६. भूशास्त्र संकुलात दि.२२/०३/२०१६ रोजी जागतिक जलदिन निमित्त जलसंसाधन या विषयी प्राध्यापकांनी (भूशझस्त्र, पर्यावरणशास्त्र, भूमाहितीशास्त्र एम.एस्सी भाग-१ व जलसाठा भविष्यातील महत्व या विषयावर व्याख्याने दिली.

१७. दि ११/०३/२०१६ रोजी भूशास्त्र संकुलातील एम.एस्सी. भाग-१ व २ मधील सर्व विद्यार्थ्यांना दातांच्या आरोग्या विषयी व्याख्यान देण्यासाठी व दातांची तपासणी करण्यासाठी डॉ. पी. जी. कानगो, अध्यक्ष, डेंटल असोशिएशन, सोलापूर यांना बोलाविण्यात आले होते. या कार्यक्रमास संकुलातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

१८. भूशास्त्र संकुलाचे शैक्षणिक मूल्यमापन दि. २९/०३/२०१६ रोजी मूल्यमापन समिती यांच्या उपस्थितीत तपासणी व अहवाल सादर करण्यात आला. शैक्षणिक मूल्यमापनकरिता संकुलातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

१९. सी.बी.एस.ई. मार्फत जे.ई.ई. पूर्व परीक्षासाठी निरीक्षक म्हणून दि. ०३/०४/२०१६ रोजी प्रा.पी.प्रभाकर व श्री.एस.पी. बाविस्कर श्रीमती गीता बालगंगाधर केंद्रीय विद्यालय, पुणे येथे हजर होते.

२०. सी.बी.एस.ई. मार्फत घेण्यात आलेल्या ऑल इंडिया प्रि.-मेडिकल / प्रि-डेन्टल परीक्षे करिता दि.३०/०४/२०१६ व ०१/०५/२०१६ रोजी श्री.एस.पी.बाविस्कर निरीक्षक म्हणून अंजू भूतानी भवन, बी.पी.विद्या मंदिर नागपूर येथे हजर होते.

२१. प्रा. पी. प्रभाकर, डॉ.मुजावर के.सी, श्रीमती गाजूल एम.डी व श्री उन्हाळे पी.एल. यांच्याकडून संशोधनपर पेपर "Prioritization of Balatira Watershed by Morphometric and Landuse Landcover Analysis, Atpadi Taluka, Sangli District, Maharastra" या विषयावर IOSR Journal of Applied Geology and Geophysics या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये Volume ४, Issue ३ Ver. १ मे २०१६ रोजी प्रकाशित करण्यात आले.

२२. डॉ. व्ही. पी. धुळप (सहाय्यक प्राध्यापक) दि.२२/०४/२०१६ ते १२/०५/२०१६ रोजी पर्यंत "६४th Interdisciplinary Refresher Course in Environment Education" करिता यूजीसी-मानव संसाधन विकास केंद्र, डिमॅट विद्यापीठ, ग्वाल्हेर येथे उपस्थित राहून यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

२३. डॉ. व्ही. पी. धुळप (सहाय्यक प्राध्यापक) यांनी "Impact of Plant Density on the Sewage Treatment through selected Aquatic Macrophytes Using Angular Horizontal Subsurface Flow Constructed Wetland" या विषयावर "International Journal of Current Microbiology and Applied Sciences" आंतरराष्ट्रीय नियत कालिकेमध्ये दि.१३/०५/२०१६ रोजी पेपर प्रकाशित करण्यात आले.

२४. डॉ. व्ही. पी. धुळप व प्रा. एस. एस. पाटील यांनी पेटेंट संशोधन दि.१८/०९/२०१५ रोजी केले. पेटेंटचे नाव- " Phyto-Purification Treatment of sewage using pennisetum purpureium through angular with zigzag or circular horizontal subsurface flow (Azhssf) Constructed" असून Volume-५, Issue-७- जुलै २०१६ रोजी प्रकाशित करण्यात आले.

२५. डॉ. .व्ही. पी. धुळप (सहाय्यक प्राध्यापक) यांना दि.२२ मे या आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर, ओयासिस फौंडेशन, पुणे आणि पंचायत समिती-खेड जि.पुणे यांच्या संयुक्त विद्यामान यांच्या नियोजनात "जैवविविधतेचे संवर्धन व जैविक संसाधनाच्या शास्वत उपयोग" या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

२६. श्री. बाविस्कर एस. पी. (सहाय्यक प्राध्यापक) यांनी दि.०९/०५/२०१६ ते ०४/०६/२०१६ रोजी पर्यंत "४ week Orientation Programme (OP-१२२)" करिता यूजीसी - मानव संसाधन विकास केंद्र, हिमाचल प्रदेश, शिमला येथे उपस्थित राहून यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

२७. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये अप्लाईड जिऑलॉजी मध्ये एकूण १६, जिऔईन्फॉमेटिक मध्ये एकूण १५ व एन्व्हायरनमेंटल सायन्स मध्ये १० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील एम.एस्सी भाग १ व २ मधील वर्ग वेळापत्रकाप्रमाणे सुरु करण्यात आले आहेत.

२८. डॉ. आर. एस. गवळी (सहयोगी प्राध्यापक) व श्री. एस. पी. बाविस्कर (सहाय्यक प्राध्यापक) दि.१० जुलै, २०१६ रोजी यूजीसी नेट परीक्षा करीता निरीक्षक म्हणून मुंबई येथे काम केले.

२९. डॉ. पी. प्रभाकर, डॉ. डी. डी. कुलकर्णी व डॉ. व्ही. पी. धुळप ह्यांची जिल्हा पर्यावरण आघात समिती, जिल्हा परिषद, सोलापूर ह्यावर विशेषतज्ञ म्हणून नियुक्ती झाली आहे.

३०. भूशास्त्र संकुलाकडे सोलापूर विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून संचालक प्रा. पी. प्रभाकर यांच्या मार्गदर्शनातून श्री. एम. एफ. मक्की, पुणे; यांनी देश-विदेशातून संग्रहीत करण्यात आलेले खनिजे, खडक, जीवाश्म व हजारे वर्षापूर्वीचे प्राण्याचे अवशेष इ. अनमोल खडकांचे प्रदर्शन दि.०१/०८/२०१६ ते ०३/०८/२०१६ रोजी आयोजित करण्यात आले. संकुलामधील प्रदर्शनासाठी संचालक प्रा. पी. प्रभाकर यांच्या योग्य नियोजन व डॉ. डी. डी. कुलकर्णी (सहायक प्राध्यापक), श्रीमती गाजूल एम. डी. (सहायक प्राध्यापक), डॉ. स्वामी एम. सी. (सहायक प्राध्यापक), श्रीमती इंगेवार एम. एम. (सहायक प्राध्यापक) आणि विद्यार्थी कडून मोठा सहभाग घेऊन प्रदर्शनाचा उपक्रम यशस्वीपणे संपन्न करण्यात आला.

सोलापूर विद्यापीठाच्या वर्धापन दिनाचे प्रमुख पाहुणे सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे मा. कुलगरु डॉ. वासुदेव गाडे व सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु मा. प्रा. एन. एन. मालदार यांच्या हस्ते सदर खनिज प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी सोलापूर विद्यापीठाचे मा. कुलसचिव, मा. परीक्षा नियंत्रक, मा. वित्त व लेखा अधिकारी, शिक्षक, विद्यापीठातील प्रशासकीय अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

या प्रदर्शनाकरिता सोलापूर शहर व जिल्हयातील शाळा, महाविद्यालय व अभियांत्रिकी महाविद्यालय यांना पत्राद्वारे आमंत्रित करण्यात आले. प्रदर्शनास सोलापूर शहर व जिल्ह्यातील अनेक शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक तसेच अनेक उद्योगपती, संशोधक, साहित्य, कला, सांस्कृतिक भागातील व्यक्तीने भेट देवून प्रदर्शन आयोजनाची प्रशंसा केली. सोलापूर शहरातील स्थानिक वृत्तपत्रातून प्रदर्शनातील देश-विदेशातून गोळा करण्यात आलेले खनिजे, खडक, जीवाश्माविषयी बरीच माहिती श्री. एम. एफ. मक्की, पुणे यांच्याकडून जाणून घेऊन त्यांच्या अद्भूत आवडीच्या छंदाबद्दल व कार्याची प्रशंसा केली.

३१. भूशास्त्र संकुतील डॉ.आर.एस.गवळी (समन्वयक, ISRO-EDUSAT) यांच्या मार्गदर्शनाखाली ISRO-EDUSAT १८ व्या अभ्यासक्रमासाठी "बेसिक ऑफ आरएस, जीआयएस, जीएनएसएस" कोर्सकरिता विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन फॉर्म भरण्यात आले आहे

३२. भूशास्त्र संकुलाचे संचालक प्रा.पी.प्रभाकर यांनी सायन्स सेंटर येथील प्रदर्शनामध्ये दि.०४/०८/२०१६ रोजी भूगर्भशास्त्र विषयातील खडकांविषयी व्याख्यान दिले.

३३. अर्थशास्त्र विभाग, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि सोलापूर विद्यापीठ अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने अर्थशास्त्राचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दि.२५/०२/२०१६ रोजी शोधनिबंध सादरीकरण स्पर्धा अयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सोलापूर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील बी. ए. भाग-३, अर्थशास्त्र, बी.कॉम. भाग-३, एम.ए. भाग-१ व २ अर्थशास्त्र या वर्गातील एकूण ६५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

३४. अर्थशास्त्र विभाग, सामाजिकशास्त्रे संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि जनगणना कार्य निदेशालय महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०४ मार्च, २०१६ रोजी "Census-२०११ Data Dissemination" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेत सोलापूर विद्यापीठ विषयाच्या एकूण १८० विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला.

३५. सोलापूर विद्यापीठामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून डॉ. गौतम कांबळे, कार्यक्रम समन्वयक यांनी रविवार, दि.०३ एप्रिल, २०१६ रोजी विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी 'सलग आठ तास अभ्यास उपक्रम' आयोजित केला होता. या उपक्रमामध्ये एकूण ११७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. एकूण ११७ विद्यार्थ्यांपैकी ७३ विद्यार्थी व ४४ विद्यार्थिनीं या उपक्रमात सहभागी झाले होते. सदर कार्यक्रमाचे उदघाटन विद्यापीठाचे कुलगुरु, प्रा. डॉ. एन.एन. मालदार यांनी केले. सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

३६. सोलापूर विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त दि.१४ एप्रिल, २०१६ रोजी सकाळी ०९.०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. श्री. प्रकाश पवार यांचे 'आधुनिक भारताच्या विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी सामाजिक शास्त्रे संकुलातील सहयोगी प्राध्यापक, डॉ. गौतम कांबळे यांच्या 'Dr. B. R. Ambedkar's Thoughts on Monetary Economics' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

३७. सामाजिकशास्त्र विद्याशाखा अंतर्गत शै. वर्ष २०१६-१७ साठी विद्यापीठ अधिविभाग व संलग्न महाविद्यालयातील अर्थशास्त्र, रुरल डेव्हलपमेंट, इतिहास, इतिहास आणि पुरातत्वशास्त्र तसेच मास कम्युनिकेशन या विषयाचे एम. एम. भाग १ ची प्रवेश पूर्व परीक्षा दि.१६ व १७ जून, २०१६ रोजी घेण्यात आली. तसेच वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील एम. कॉम भाग-१ च्या प्रवेश पूर्व परीक्षा दि.१७/०६/२०१६ रोजी झाली त्यामध्ये १८० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. सदर परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी गुणानुक्रमे दि.०४ जुलै, २०१६ व दि.१२ जुलै, २०१६ रोजी प्रथम व द्वितीय फेरी मध्ये प्रवेश देण्यात आला.

३८. दि.२३ जून, २०१६ रोजी डॉ. माया पाटील, विभागप्रमुख, इतिहास व पुरातत्वशास्त्र विभाग यांनी “हरप्पन संस्कृती” या विषयावर रोटरी क्लब मेसॉनिक हॉल, सोलापूर येथे व्याख्यान दिले.

३९. दि.०३ जुलै, २०१६ रोजी डॉ. माया पाटील, विभागप्रमुख, इतिहास व पुरातत्वशास्त्र विभाग यांनी माणकेश्वर, ता. भूम, जि. उस्मानाबाद येथे क्षेत्रीय भेट व व्याख्यान दिले.

४०. डॉ. सी. एस. भानुमते, विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग यांनी बी. कॉम. भाग -१ साठी “व्यावसायिक अर्थशास्त्र” नावाचे पुस्तक लिहिण्यामध्ये सहलेखक म्हणुन सहभाग घेतला.

४१. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने दि.१२ जुलै, २०१६ रोजी मुंबई येथे मास कम्युनिकेशन विभाग प्रमुखांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीस सोलापूर विद्यापीठाकडून डॉ. आर. बी. चिंचोळकर उपस्थित होते. मतदार जागृतीसाठी मास कम्युनिकेशन विभागाने सहाकार्य करण्याबाबत राज्य निवडणूक आयूक्त मा. जे. एस. सहारिया यांनी या बैठकीत मार्गदर्शन केले.

४२. डॉ. आर. बी. चिंचोळकर, विभागप्रमुख, मास कम्युनिकेशन यांचे सामाजिकशास्त्रे संकुलामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे मतदार यादीमध्ये नोंदविण्याकरीता “नोडल ऑफिसर” म्हणून नामनिर्देशन करण्यात आले. त्याअनुषंगाने दि.१८ जुलै, २०१६ रोजी संकुलामध्ये शै. वर्ष २०१६-१७ करीता प्रवेशित विद्यार्थ्यांमधील मतदार यादीत नाव नसलेल्या विद्यार्थ्यांकरीता विद्यार्थी मतदार नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात येऊन मतदार नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची यादी सोलापूर महानगरपालिका येथील निवडणूक विभागाकडे पाठविण्यात आली. विद्यार्थी मतदार नोंदणी अभियानाचे अनुषंगाने, विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनाकरीता मास कम्युनिकेशन विभागातर्फे दोन लघुपटांची निर्मिती करण्यात आली.

४३. सोलापूर विद्यापीठाच्या १२ व्या वर्धापन दिनानिमित्त मास कम्युनिकेशन विभागातर्फे विद्यावार्ता लॅब जर्नलचा अंक तयार करुन त्याचे वितरण दि.०१ ऑगस्ट, २०१६ रोजी करण्यात आले.

४४. दि.२८ जुलै, २०१६ रोजी “A Study of Social and Economics of Women in Slum Area of Western Maharashtra” या विषयावर ICSSR, New Delhi यांच्याकडे Research Programme अंतर्गत इकॉनॉमिक्स विभागाचे विभागप्रमुख डॉ. सी. एस. भानुमते यांनी Reseach Project सादर केले आहे.

४५. रशियन व चिनी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे ऑगस्ट-नोव्हेंबर, २०१६ असे तीमाही वर्गाच्या प्रवेश प्रक्रिया दि.०२ ऑगस्ट, २०१६ पासून सुरु करण्यात आली.

४६. दि.१३/०२/२०१६ रोजी वाणिज्य व व्यवस्थापन संकुल सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि हुतात्मा सेक्युलर फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय राज्यघटना व धर्मनिरपेक्ष लोकशाही' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन कराण्यात आले. या कार्यशाळेत शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

४७. एम. कॉम. भाग-१ साठी राबविण्यात आलेल्या प्रवेश पूर्व परीक्षेचा निकाल दि.२३ जून २०१६ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहिर करण्यात आला व गुणवत्ता यादी नुसार पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. दि.२५ जुलै, २०१६ रोजी एम. कॉम. भाग-१ साठी द्वितीय प्रवेश पूर्व परीक्षा वाणिज्य व व्यवस्थापन संकुलामध्ये घेण्यात आली. या पूर्व परीक्षेमध्ये पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना दि.२७ जुलै, २०१६ पासून प्रवेश देण्यात आला.

४८. विविध संकुलांकडून आलेल्या याद्याप्रमाणे पुस्तके खरेदीची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे व त्या पुस्तकांचे Accession व Call Nos. इत्यादी बाबी पूर्ण करण्याची प्रक्रिया चालू आहे.

४९. परदेशी नियतकालिकासाठी e-Tender खरेदीची प्रक्रिया अवलंबली असता त्यास नियतकालिके पुरवठाधारकाकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न मिळाल्याने, नवीन निविदा मागविण्याची प्रक्रिया चालू आहे.

५०. RUSA अंतर्गत e-Books खरेदी व सन २०१६ करिता परदेशी नियतकालिके खरेदीचा करार पूर्ण करण्यात येऊन RUSA अंतर्गत e-Books व Print Journals च्या खरेदीचे आदेश देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

५१. पूर्वीच्या पी.जी.टी.सी. ग्रंथालयाची पुस्तके व ग्रंथालयास देणगी दाखल प्राप्त झालेली जुनी पुस्तके अशी एकूण ७०८ पुस्तकांची व्यवस्थित बांधणी करुन घेण्यात आली आहे.

**"फ" राष्ट्रीय सेवा योजना:**

१. स्वच्छ भारत अभियान ग्राम दत्तक योजनेअंतर्गत सोलापूर विद्यापीठाने दत्तक घेतलेल्या सात गावांना राष्ट्रीय स्तरावर आदर्श गाव म्हणून ओळख प्राप्त व्हावी अशा संकल्प सिध्दीसाठी विद्यापीठ प्रयत्नात आहे. त्याअनुषंगाने गावाचा सर्वांगीन विकास साधण्यासाठी दत्तक घेतलेल्या गावांमध्ये विविध कार्यक्रम राबविणे व नियंत्रण ठेवणे या करीता गठित केलेल्या समित्यांची एकत्रित बैठक दि.०८/०३/२०१६ रोजी विद्यापीठ सभागृहामध्ये मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

२. सन २०१५-१६ या वर्षात जलव्यवस्थानासाठी युवक या विषयावर आधारीत सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या एकूण ४५ महाविद्यालयांचे ०७ दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीरे संपन्न झाली. या शिबीरामध्ये एकूण ३६१४ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

३. भारत सरकारच्या निर्देशानुसार राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मता शिबीर दि.२८/०२/२०१६ ते दि.०५/०३/२०१६ या कालावधीत श्री. जगद्‌गुरु चंद्रशेखर भारती मेमोरिअल कॉलेज, श्रीनगेरी कर्नाटका या ठीकाणी संपन्न झाले. या शिबीरामध्ये प्रस्तुत विद्यापीठाचे ०५ मुले, ०५ मुली व ०१ संघव्यवस्थापक असा एकूण ११ जणांचा संघ सहभागी झाला. या शिबीरासाठी महाराष्ट्रातून एकमेव सोलापूर विद्यापीठाची निवड राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निदेशालय, पुणे यांच्या मार्फत करण्यात आली.

४. दि.१८/०२/२०१६ ते दि.२४/०२/२०१६ या कालावधीत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि डी.बी.एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शेळगी डी.बी.एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर येथे ३०० राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचे राज्यस्तरीय विशेष रमसंस्कार शिबीर संपन्न झाले.

५. श्री संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीचे स्वागत सोलापूर विद्यापीठाच्या वतीने सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात धर्मपुरी येथे शनिवार दि.०९/०७/२०१६ रोजी सकाळी ०९:०० वा. मा. संचालक, बी.सी.यु.डी व मा. परीक्षा नियंत्रक, सोलापूर विद्यापीठ यांच्या हस्ते करण्यात आले व श्री संत तुकाराम महाराजाच्या पालखीचे स्वागत सराटी पुल (अकलूज) येथे रविवार दि.१०/०७/२०१६ रोजी सकाळी ०७:३० वा मा. कुलसचिव व मा. परीक्षा नियंत्रक, सोलापूर विद्यापीठ यांच्या हस्ते करण्यात आले.

६. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर व लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल याच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून सोमवार, दि.११ जुलै, २०१६ रोजी सोलापूर येथे भव्यजनजागरण दिंडीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सोलापूर शहरातील विद्यापीठ संलग्नित रा. से. यो. महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक / स्वयंसेविका व कार्यक्रम अधिकारी यांनी आपला सहभाग नोंदविला.

७. पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या सुचनेनुसार आषाढीवारी पंढरपूर यात्रा २०१६ बंदोबस्ता दरम्यान दि.०९/०७/२०१६ ते दि.१७/०७/२०१६ या कालावधीत ग्रामीण भागातील सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या महाविद्यालयांचे स्वयंसेवक बंदोबस्तासाठी पोलीस अधिक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण यांना उपलब्ध करुन देण्यात आले.

८. सन २०१६-१७ मधील पावसाळ्यात वनमहोत्सव कालावधीमध्ये दि.०१ जुलै, २०१६ रोजी एकाच दिवशी ०२ कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्याचे शासनाने ठरविले. त्यानुषंगाने दि.०१ जुलै ते ०७ जुलै, २०१६ या वनसप्ताह कालावधीत दि.०१ जुलै, २०१६ ह्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत रासेयो एकक असलेल्या महाविद्यलयांमध्ये तसेच विद्यापीठ परिसरामध्ये वृक्षारोपन करण्यात आले.

९. राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये नि:स्वार्थ भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करणाऱ्यांना त्यांच्या अंगिकृत कामात प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या नि:श्वार्थ सेवेचा यथोचित गौरव करण्याच्या दृष्टीने सोलापूर विद्यापीठांतर्गत कार्यक्रम समन्वयक / महाविद्यालय / कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले आहे.

   १. **कार्यक्रम समन्वयक प्रशंसा प्रमाणपत्र पुरस्कार:**
      डॉ. बब्रुवान नामदेव कांबळे, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
   २. **कार्यक्रम अधिकारी प्रशंसा प्रमाणपत्र पुरस्कार:**
      प्रा. डॉ. दंडे व्ही. सी., डी.बी.एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर
   ३. **उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार:**
      श्री. शेख आफताब अन्वर, डी.बी.एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर-स्मृतिचिन्ह व रु. २,०००/-

१०. राजभवनकडून प्राप्त झालेल्या पत्रान्वये राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून कळविल्यानुसार सोलापूर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयामध्ये तसेच महाविद्यालयांनी दत्तक घेतलेल्या गावांमध्ये जलतज्ज्ञांचा सल्ला/मार्गदर्शन घेऊन बोअर पुनर्भरण आणि विहीर पुनर्भरण या कामाला प्राधान्य देऊन जल पुनर्भरणाचा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे.

"ग" क्रीडा व विद्यार्थी कल्याण विभाग:

१. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धा पंजब विद्यापीठ, पंजाब येथे दि.११/०२/२०१६ ते दि.१६/०२/२०१६ या दरम्यान संपन्न झाल्या यामध्ये प्रस्तुत विद्यापीठ संघातील कुमारी श्वेतांबरी सुदेश मालप या विद्यार्थीनीला ब्रान्झ पदक मिळाले.

२. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे दि.१०/०२/२०१६ ते दि.१३/०२/२०१६ या कालावधीत पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो या खेळात सोलापूर विद्यापीठ मुलांचा संघ सहभागी झाला व उल्लेखनीय यश प्राप्त केले त्यामुळे सदर संघ आखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी पात्र झाला.

३. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ आर्चरी या स्पर्धेत सोलापूर विद्यापीठाची कु. स्वाती बाहुबली नगरकर (शिवाजी महाविद्यालय, बार्शी) हिची भारतीय आर्चरी संघाच्या निवड चाचणीसाठी दि.२१ ते २२ एप्रिल, २०१६ या कालावधीत पंजाब विद्यापीठ, पतियाळा येथे निवड झाली.

४. विविध महाविद्यालयाकडून आखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा प्रकारात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर १० गुण मिळण्यासाठीचे प्रस्ताव क्रीडा विभागास प्राप्त झाले होते सदर प्रस्तावाची छाननी करण्यात येवून प्राप्त प्रस्ताव परीक्षा विभागाकडे पाठविण्यात आले आहेत.

५. मा. कुलगुरुमहोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ०५ जुलै, २०१६ रोजी संपन्न झालेल्या BOS-PC बैठकीतील ठरावानुसार सन २०१५-१६ मध्ये झालेल्या आखिल भारतीय आंतरविद्यापीठ / पश्चिम विभागीय / क्रीडा महोत्सव स्पर्धेतील विजेते गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या संघ मार्गदर्शक/संघ व्यवस्थापकांचा विद्यापीठ वर्धापनदिनी सत्कार करण्यासाठी ब्लेझर व स्मृती चिन्ह देण्यासाठी दरपत्रके मागवून प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करुन ब्लेझर व स्मृती चिन्ह तयार करुन घेण्यात आले. विद्यापीठ वर्धापनदिनी या गुणवंत खेळाडूंना स्मृतिचिन्ह, ब्लेझर, रोख रक्कम बक्षिस देण्यात येवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

६. प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील शा. शिक्षण संचालकांना क्रीडा विभागाच्या Hand Book बाबत मार्गदर्शन पर कार्यशाळा आयोजित करण्यासाठी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली असून त्यानुसार सदर कार्यशाळा नियोजनाचे कामकाज सुरु आहे.

७. १४ वा आंतरराष्ट्रीय युवा महोत्सव राजस्थान विद्यापीठ, जयपूर येथे दि.१८/०२/२०१६ ते दि.२०/०२/२०१६ या कालावधीत संपन्न झाला. या युवा महोत्सवात सोलापूर विद्यापीठाने एकूण ०८ पारितोषिके मिळाली. स्थळ चित्र या स्पर्धेत प्रदिप भद्रशेट्टी याला प्रथम क्रमांक मिळाला. शास्त्रीय गायन या कलाप्रकारात कु. केतकी रानडे हिला द्वितीय क्रमांक मिळाला. इंग्रजी - वाद विवाद कला प्रकारात गुलशन कुकरेजा व मुरली गालपल्ली यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. मुकनाट्य या सांघिक स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला. माती काम या कलाप्रकारात रविंद्र सुतकर याला तृतीय क्रमांक तर कातरकाम या कला प्रकरात श्रीकांत भिसे याला तृतिय क्रमांक मिळाला.

८. विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या पालकासह शिक्षक प्रशासकीय कर्मचारी विमा योजनेत टाटा ए.आय.जी. जनरल इंन्सूरन्स कंपनी सोलापूर यांच्याकडे विद्यापीठातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचा प्रती रु.९/- प्रमाणे अपघाती विमा उतरविण्यात आला आहे.

९. शै. वर्ष सन २०१६-१७ या वर्षात विमाबाबतची कार्यवाही करताना सर्व संलग्न महाविद्यालयांना टाटा ए.आय.जी. जनरल इन्शूरन्स कंपनी सोलापूर यांच्याकडे विमा उतरविण्याबाबत परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात आले आहे.

१०. सोलापूर विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना संधी मिळावी या उद्देशाने विद्यापीठातर्फे “सृजनरंग” नियतकालिका स्पर्धा २०१५-१६ आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत पारंपारिक व व्यावसायिक अशा एकूण ३५ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला.

**सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या सृजनरंग २०१५-१६ पारंपारिक महाविद्यालय नियतकालिक स्पर्धेचा निकाल**

**पारंपारिक महाविद्यालये सर्वसाधारण विजेते पद**

| अ. क्र. | पारितोषीक प्राप्त महाविद्यालयाचे नाव | पारितोषीक प्राप्त नियतकालिकाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर | प्रज्ञा | प्रथम |
| २. | हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर | हिरा | द्वितीय |
| ३. | वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर | विद्यारयण | तृतीय |
| ४. | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर | कर्मवीर | उत्तेजनार्थ |
| ५. | शिवाजी महाविद्यालय, बार्शी | शिवयुग | उत्तेजनार्थ |

**सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या सृजनरंग २०१५-१६ व्यावसायिक महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेचा**

**सर्वसाधारण विजेतेपदाचा व वैयक्तीक निकाल**

| अ. क्र. | पारितोषीक प्राप्त महाविद्यालयाचे नाव | पारितोषिक प्राप्त नियतकालिकाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर | विटनेस | प्रथम |
| २. | नागेश करजगी ऑर्कीड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर | आर्कीडऔरा | द्वितीय |
| ३. | एन.बी. नवले सिहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर | साहित्यगड | तृतिय |
| ४. | ब्रम्हदेवदादा माने अभियांत्रिकी महाविद्यालय, बेलाटी | बिमाइट | उत्तेजनार्थ |
| ५. | व्ही.व्ही.पी. अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर | विद्या | उत्तेजनार्थ |

उपरोक्त सर्वसाधारण विजेते पद मिळविलेल्या महाविद्यालयांना १ ऑगस्ट, २०१६ विद्यापीठ वर्धापन दिन रोजी विद्यापीठात आमंत्रित करुन सत्कार करण्यात आला.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

**[ १ ] अधिसभेच्या दि.१९ मार्च, २०१६ रोजी झालेल्या बाराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/३२४२, दि.२९/०३/२०१६ अन्वये, दि.१९ मार्च, २०१६ रोजी झालेल्या बाराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.२६/०४/२०१६ अशी होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.१९ मार्च, २०१६ रोजी झालेल्या बाराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेसाठी सादर).

ठराव: **अधिसभेच्या दि.१९ मार्च, २०१६ रोजी झालेल्या बाराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.**

**[ २ ] सन २०१५-१६ चे वार्षिक लेखे लेखापरिक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.**

प्राचार्य आर. वाय. पाटील यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने शिफारस केल्याप्रमाणे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व लेखापरीक्षण आक्षेप पूर्तता समितीच्या शिफारशी मान्य करुन व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारात घेता असा ठराव करते की, सन २०१५-१६ च्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: सन २०१५-१६ चे वार्षिक लेखे व लेखापरिक्षण अहवाल लेखापरिक्षक M/s. TAP & Associates, Solapur यांनी अंतिम करुन सादर केल्यानंतर समान लेखा संहिता (Common Account Code) तरतूद क्र.1.50 (i) नुसार लेखापरिक्षणातील आक्षेप वगळण्याबाबतची शिफारस करण्याकरिता मा. कुलगुरु यांनी वित्त व लेखा समितीची खालील उपसमिती गठीत केली.

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील | अध्यक्ष |
| २) | प्रा. डॉ. ए. ए. शेख | तज्ञ सदस्य |
| ३) | प्राचार्य एम. ए. दलाल | तज्ञ सदस्य |
| ४) | प्रा. बी. सी. शेवाळे | सदस्य - सचिव |

या समितीने दि.१६/०७/२०१६ रोजी बैठक आयोजित करुन लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपावर सविस्तर चर्चा केली व सादर केलेल्या कागदपत्रावर आक्षेप वगळण्याबाबतची शिफारस अहवाल या कार्यालयाकडे सादर केला. दि.२५/०७/२०१६ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत विषय क्र.२ अन्वये लेखापरिक्षक यांनी सादर केलेला लेखापरिक्षण अहवाल व आक्षेप पूर्तता अहवाल विचारार्थ सादर करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव : | लेखापरिक्षण अहवाल व लेखापरिक्षीत लेख्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपाबाबत पूर्तता समितीने सादर केलेल्या आक्षेप पूर्तता अहवाल स्विकारण्यात येवून लेखापरिक्षण अहवाल व लेखापरिक्षीत लेखे पूर्तता अहवालासह मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दि.२६/०७/२०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव : | सन २०१५-१६ चा लेखापरिक्षण अहवाल व लेखापरिक्षीत लेखेची वित्त व लेखा समितीची शिफारस स्विकारण्यात येवून अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

सबब, सन २०१५-१६ चे वार्षिक लेखे, लेखापरिक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस अधिसभेच्या विचारार्थ).

**ठराव: प्राचार्य आर. वाय. पाटील यांनी सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास श्री. एच. बी. मते यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सन २०१५-१६ च्या वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालातील कार्यालयाने केलेली पूर्तता यावर साधक बाधक चर्चा झाली व चर्चेअंती लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून सदर प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**[ ३ ] महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ ला अनुसरुन तयार करण्यात आलेला विद्यापीठाच्या अधिनियम S.341 मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीसंदर्भात व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तूत विद्यापीठाच्या परिनियमानुसार विद्यापीठाकडे असलेल्या सिव्हील इंजिनिअरींग कामाची विभागणी मायनर काम व मेजर काम अशी करण्यात आलेली आहे. यामध्ये रु.२५ लाखाच्या आतील कामांना मायनर कामे व त्यापुढील कामांना मेजर कामे असे वर्गीकरण करण्यात आले आहे. विद्यापीठ परिनियम S.341 नुसार विद्यापीठांना मायनर कामे करता येतात व मेजर कामे ज्याची किंमत रु.२५ लाखापेक्षा जास्त आहे अशी कामे बांधकाम विभाग यांच्याकडे पैसे वर्ग करुन घ्यावी लागतात.

सद्यस्थितीत प्रस्तूत विद्यापीठामध्ये बहुतांश कामे ही रु.२५ लाखावरील होत आहे. त्यामूळे २५ लाखाच्या पुढील कामे बांधकाम विभागाकडे वर्ग करावे लागत आहेत.

रु.२५ लाखावरील कामे ही विद्यापीठामार्फत करावयाची झाल्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कामाची मर्यादा वाढविणे गरजेचे आहे. यामध्ये बदल करावयाचे झाल्यास तसा विषय प्रथमत: व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करुन व्यवस्थापन परिषदेकडून अधिसभेला शिफारस होणे आवश्यक आहे व अधिसभेच्या मान्यतेअंती परिनियमातील बदल करण्यास मान्यता मिळण्यासाठी मा. कुलपती महोदय यांच्याकडे प्रस्ताव सादर करावा लागणार आहे.

विद्यापीठाने करावयाची कामाची मर्यादा ही रु.२५ लाखावरुन रु.३ कोटीपर्यंत वाढविण्याबाबतचा विषय दि.१६/०६/२०१६ रोजीच्या बांधकाम समितीसमोर सादर केला असता, ठराव क्र.०२ अन्वये कामाच्या मर्यादा वाढीस मान्यता मिळण्यासाठी व्यवस्थापन परिषदेला शिफारस केली आहे. हा विषय दि.२८/०६/२०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र.२१ अन्वये सादर केला असता, S.341 मध्ये नमूद केलेल्या मायनर कामाची (minor work) मर्यादा रु.२५ लाखावरुन रु.७ कोटी करण्याची शिफारस केलेली आहे. कामाची मर्यादा वाढविण्यासाठी परिनियम S.341 मध्ये करावयाच्या बदलाचा मसूदा सोबत जोडलेला आहे.

सदरबाबत परिनियम S.341 मध्ये दुरुस्ती करण्याबाबत अधिसभेस शिफारस करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या दि.२६/०७/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत आयत्या वेळेचा विषय क्र.८(५) नुसार सादर केले असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव क्र.८(५) | महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ ला अनुसरुन तयार करण्यात आलेला विद्यापीठाच्या अधिनियम S.341 मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीची शिफारस अधिसभेस करण्यात आली. |

सबब, विद्यापीठाच्या परिनियम S.341 मध्ये नमूद केलेल्या मायनर कामाची (minor work) मर्यादा रु.२५ लाखावरुन रु.७ कोटी करण्याची व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव: महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ ला अनुसरुन तयार करण्यात आलेल्या विद्यापीठाच्या अधिनियम S.341 मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीसंदर्भात व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सदरचे अधिनियम S.341 मा. कुलपती यांच्या मान्यतेसाठी पाठवावे असे ठरले.**

**[ ४ ] शै. वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदानित तत्वावर नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम व विद्याशाखा सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरिता विद्या परिषदेने शिफारस केलेला शै. वर्ष २०१७-१८ या एका वर्षाचा बृहत आराखडा अधिसभेच्या विचारार्थ.**

(टिपणी: बृहत आरखड्याबाबत म. वि. कायदा १९९४ ८२(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

म. वि. कायदा १९९४ कलम ८२(१) तरतूद: The university shall prepare a perspective plan and get the same approved by the State Council for Higher Education for educational development for the location of colleges and institutions of higher learning in a manner ensuring equitable distribution of facilities for having due regard, in particular, to the need of unserved and under developed areas within the jurisdiction of the university, Such plan shall be prepared by BCUD and shall be placed before the Academic Council and the Senate through the Management Council and shall, if necessary, be updated every year.

त्या अनुषंगाने महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने दि.१८/०४/२०१६ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.०५ अन्वये शै. वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षीय दिर्घकालीन बृहत आराखड्यास अनुसरुन शै. वर्ष २०१७-१८ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी म. वि. कायदा १९९४ कलम ८२(१) नुसार शै. वर्ष २०१७-१८ या एका वर्षाचा बृहत आराखडा तयार करुन व्यवस्थापन परिषदेला शिफारस केलेला होता. सदर बृहत आराखडा दि.२३/०४/२०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता, ठराव क्र.०४ अन्वये व्यवस्थापन परिषदेने विद्या परिषदेस शिफारस केलेला होता. तद्नंतर दि.१९/०८/२०१६ च्या विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.६२ नुसार व्यवस्थापन परिषदेने शिफारस केलेला शै. वर्ष २०१७-१८ या एका वर्षाचा बृहत आराखडा करिताचा खालीलप्रमाणे दुरुस्तीसह अधिसभेस शिफारस केलेला आहे.

**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**शै. वर्ष २०१७-१८ पासून नवीन महाविद्यालय / अभ्यासक्रम / विद्याशाखा सुरु करु इच्छिणाऱ्या संस्थांसाठी शैक्षणिक बृहत आराखडा**

सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रात ज्या नोंदणीकृत संस्थांना शै. वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदानित तत्वावर खालीलप्रमाणे (प्रस्तावित ठिकाण व त्या समोरील अभ्यासक्रमासाठी) नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहेत. (बी. बी. ए., बी. सी. ए., बी. एस्सी. (ई. सी. एस.), शिक्षणशास्त्र, समाजकार्य (बी. एस. डब्ल्यू व एम. एस. डब्ल्यू.), इंजिनिअरींग, फार्मसी, एम. बी. ए., बायोटेक्नॉलॉजी व एम. सी. ए. या अभ्यासक्रमाची महाविद्यालये वगळता) अशा सर्व नोंदणीकृत संस्थांना कळविण्यात येते की, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे (विद्यापीठाच्या बृहत आराखड्यानूसारच) विद्यापीठाच्या विहीत नमून्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. **सदर बृहत आराखडा हा विद्यापीठ परिसर व संलग्नित महाविद्यालयामध्ये नवीन अभ्यासक्रम व नवीन विद्याशाखा सुरु करण्यासाठीही लागू राहील.**

नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२(३) नुसार दि.३१ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत विद्यापीठाकडे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ कार्यालयात, कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळता स्विकारण्यात येतील. विहीत नमुन्यातील अर्ज वित्त व लेखा विभाग (प्रकाशन विभागात) रु.१,०००/- शुल्कास कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | बृहत आरखड्यातील ठिकाण | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १. | **सोलापूर शहर** | |
| | सोलापूर शहर | बॅचलर ऑफ लायब्ररी अॅन्ड इन्फॉर्मेशन सायन्स |
| | | बॅचलर ऑफ जरनॅलिझम अॅन्ड मास कम्युनिकेशन |
| | | विधी महाविद्यालय |
| | | चित्रकला महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | | बी. एफ. ए., एम. एफ. ए. |
| | | बी. आर्किटेक्चर |
| २. | **उत्तर सोलापूर** | |
| | वडाळा | वाणिज्य महाविद्यालय, विज्ञान महाविद्यालय |
| ३. | **दक्षिण सोलापूर** | |
| | वळसंग | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | बोरामणी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | होटगी / फताटेवाडी / आहेरवाडी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ४. | **अक्कलकोट** | |
| | अक्कलकोट | विज्ञान महाविद्यालय |
| | | कला विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | दुधनी / चपळगाव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | मैंदर्गी | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| ५. | **बार्शी** | |
| | बार्शी | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| | वैराग | विज्ञान महाविद्यालय |
| | | कला व सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | जामगाव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | रेल्वे इंजिनिअरींग महाविद्यालय |
| | मालवंडी | कला महाविद्यालय |
| ६. | **मोहोळ** | |
| | मोहोळ | विज्ञान महाविद्यालय |
| | नरखेड | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | कामती बुद्रुक / कुरुल | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ७. | **मंगळवेढा** | |
| | मंगळवेढा / नंदेश्वर | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| | बोराळे / डोणज | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | सलगर (बु.) | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ८. | **सांगोला** | |
| | सांगोला / जुनोनी | बॅचलर ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी अॅन्ड डिझाईन |
| | चिकमहूद / महूद / वाकी शेवणे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |

| ९. | माढा | |
|---|---|---|
| | माढा / कुर्डूवाडी | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | टेंभूर्णी | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | बी. जी. सी. व एम. जे. सी. |
| १०. | माळशिरस | |
| | माळशिरस | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | नातेपुते | वाणिज्य महाविद्यालय |
| | | जर्नलिझम महाविद्यालय |
| | जाधववाडी | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | पानीव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | तांबवे | कला महाविद्यालय |
| ११. | करमाळा | |
| | करमाळा | विज्ञान महाविद्यालय |
| | जेऊर / झरे | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | भिलारवाडी / जिंती | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| १२. | पंढरपूर | |
| | पंढरपूर | संत वाडमय महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय |
| | | कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय |
| | कोर्टी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | चळे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| टिप: | | |
| १. | शै. वर्ष २०१६-१७ साठी मान्यता प्राप्त संस्था / संलग्नित महाविद्यालयांकडून बी. बी. ए., बी. सी. ए., बी. एस्सी (ई. सी. एस.), शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र, समाजकार्य (एम. एस. डब्ल्यू.), इंजिनिअरींग, फार्मसी, एम. बी. ए., बायोटेक्नॉलॉजी व एम. सी. ए. या अभ्यासक्रमाचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. | |
| २. | नॅक मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन झालेल्या "अ" मानांकन प्राप्त महाविद्यालयाना प्राध्यान्य असेल. | |
| ३. | नामवंत औद्यौगिक संस्थांना सामाजिक बांधीलकी म्हणून नवीन उच्च दर्जाची महाविद्यालये / अभ्यासक्रम सुरु करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. | |
| ४. | बृहत आराखडा संदर्भात शासनाकडून वेळोवेळी विहीत केली जाणारी मार्गदर्शक तत्वे / सूचना / आदेश लागू राहतील. | |

**SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR**
**Academic Prospective Plan**
**For Solapur University Campus, Solapur**
**2017-18**
**New Academic Departments on Campus (Proposed)**

| Sr. No. | Name of the Proposed Department |
|---|---|
| | **FACULTY OF ARTS** |
| 1. | Department of English |
| 2. | Department of Hindi |
| 3. | Department of Marathi |
| 4. | Department of Chinese |
| 5. | Department of Sanskrit and Prakrit Language |
| 6. | Department of Kannada |
| 7. | Department of Foreign Language (French, German, Russian, Japanese) |

| | |
|---|---|
| 8. | Department of Urdu |
| 9. | Department of Fine Arts (Music, Drama, Fashion Design & Fine Arts) |
| **FACULTY OF COMMERCE AND MANAGEMENT** | |
| 1. | Department of Commerce |
| 2. | Department of Management |
| **FACULTY OF SCIENCE** | |
| 1. | Department of Bio-Technology |
| 2. | department of Food Science & Nutrition |
| 3. | Department of Zoology |
| 4. | Department of Geography |
| 5. | Department of Botany |
| 6. | Department of Bio Chemistry |
| 7. | Department of Scientific Computing |
| 8. | Department of Bioinformatics |
| 9. | Department of Microbiology |
| 10. | Department of I.T. |
| 11. | Department of Inorganic Chemistry |
| 12. | Department of Analytical Chemistry |
| 13. | Department of Physical Chemistry |
| 14. | Department of Medicinal Chemistry |
| **Sr. No.** | **Name of the Proposed Department** |
| 15. | Department of Textile Chemistry |
| 16. | Department of Petroleum Geology |
| 17. | Department of Environmental Geology |
| 18. | Department of Nano Science & Nano Technology |
| 19. | Department of Disaster Management |
| **FACULTY OF LAW** | |
| 1. | Department of Law |
| **FACULTY OF SOCIAL SCIENCES** | |
| 1. | Department of Economics |
| 2. | Department of History |
| 3. | Department of Library & Information Science |
| 4. | Department of Philosophy |
| 5. | Department of Psychology |
| 6. | Department of Political Science |
| 7. | Department of Women Study & Human Rights |
| 8. | Department of Adult & Continuing Education |
| 9. | Department of Sociology |
| 10. | Department of Human Rights |
| 11. | Department of Tourism |
| 12. | Department of Futuristic Studies |
| **FACULTY OF ENGINEERING & TECHNOLOGY** | |
| 1. | Department of Pharmacy |
| **FACULTY OF SPORTS EDUCATION** | |
| 1. | Department of Sports |
| **FACULTY OF TECHNOLOGY** | |
| 1. | Department of Technology |
| **FACULTY OF EDUCATION** | |
| 1. | Department of Education |
| 2. | Department of Physical Education |
| **OTHER FACULTY** | |
| 1. | National Service Scheme |
| 2. | Department of Students Welfare |
| 3. | Competitive Exam Centre and Placement Cell |
| 4. | Academic Staff College |

उपरोक्तप्रमाणे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला बृहत आराखडा शासनाकडे मान्यतेकरिता सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषद, विद्या परिषदेनी मान्यता दिलेली आहे. सदर बृहत आराखड्यास अधिसभेची मान्यता घेवून दि.३१ ऑगस्ट, २०१६ पूर्वी शासनास शिफारस करावयाचा आहे. तसेच दि.३०/१०/२०१० च्या शासन निर्णयानुसार नवीन महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, विद्याशाखांचे प्रस्ताव स्विकारण्याची अंतिम तारीख ही ३१ ऑक्टोबर असल्याने प्रस्ताव स्विकारण्यासाठी बृहत आराखडा अधिसभेच्या मान्यतेअंती महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठवून शासन मान्यतेनंतर वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

सबब, शै. वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदानित तत्वावर नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम व विद्याशाखा सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरिता विद्या परिषदेने शिफारस केलेला शै. वर्ष २०१७-१८ या एका वर्षाचा बृहत आराखडा अधिसभेच्या विचारार्थ).

**ठराव: शै. वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदानित तत्वावर नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम व विद्याशाखा सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरिता विद्या परिषदेने शिफारस केलेल्या शै. वर्ष २०१७-१८ या एका वर्षाचा बृहत आराखड्यात खालील दुरुस्तीसह स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | बृहत आरखड्यातील ठिकाण | खालील अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात यावा |
|---|---|---|
| १. | सोलापूर शहर | |
| | सोलापूर शहर | M. Sc. Physics |
| | | M. Sc. Physics (Solid State) |
| | | M. Sc. (Medicinal Chemistry) |
| | | M. Sc. Microbiology (Applied Microbilogy) |
| | | M. Sc. Microbiology (Industrial Microbiology) |

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-
कुलसचिव
सचिव, अधिसभा

सही/-
मा. कुलगुरु
अध्यक्ष, अधिसभा